# बुचकेवाडी ते वैष्णवधाम...




**एका गावाचा सामूहिक नेतृत्वातून सर्वांगीण विकासाकडे प्रवास**

◆
संकल्पना
**रावसाहेब बढे**

◆
लेखन-संकलन
**प्रशांत खुंटे**

◆
मुखपृष्ठ-कलानिर्देशन
**आर्ट ॲडव्हर्टायझिंग**

◆
मुद्रितशोधन
**अशोक देव**

◆
लेखनसाह्य
**व्यंकटेश शेटे, नाजीम पठाण**

◆
प्रकाशक
**लुपिन ह्युमन वेल्फेअर अँड रिसर्च फाउंडेशन**
**पुणे कार्यालयाचा पत्ता** : सर्वे नं.- ४६-अे,
मौजे नांदे, तालुका - मुळशी, जिल्हा - पुणे,
पिनकोड - ४११ ०४२.
ई-मेल : pune@lupinfoundation.in
वेबसाइट : www.lupinfoundation.in
फोन क्र. : ०२०-२०२७०२९७

◆
प्रकाशन
**२ ऑक्टोबर २०१४, महात्मा गांधी जयंती**

# बुचकेवाडी ते वैष्णवधाम...

एका गावाचा सामूहिक नेतृत्वातून
सर्वांगीण विकासाकडे प्रवास

लुपिन ह्युमन वेल्फेअर अँड रिसर्च फाउंडेशन




# अ नु क्र म णि का

प्रस्तावना ३

पार्श्वभूमी : बुचकेवाडी ते वैष्णवधाम प्रवासाची ४

लुपिन फाउंडेशन ग्रामविकासाची भूमिका ९

पाणलोट क्षेत्रविकास : सर्वांगीण विकासाला भिडण्याची गुरुकिल्ली १०

बुचकेवाडीतील नावीन्यपूर्ण उपक्रम १७

ग्रामस्थांचं अनुभवकथन ३६





# प्रस्तावना

मा. श्री. सीताराम गुप्ता
कार्यकारी संचालक, लुपिन फाउंडेशन

२ ऑक्टोबर १९८८ सालापासून लुपिन फाउंडेशनने ग्रामविकासाचे उपक्रम हाती घेतले. हे उपक्रम सुरू करताना मुद्दामच गांधी जयंतीचं औचित्य साधण्यात आलं होतं. कारण गांधीजींच्या स्वप्नातील स्वयंपूर्ण खेडी निर्माण करणे हे आम्ही आमचं ध्येय्य मानलं आहे. ते पूर्ण करण्यासाठी आम्ही राजस्थान, मध्य प्रदेश, उत्तराखंड, गुजरात नि महाराष्ट्र या राज्यांत वेगवेगळे उपक्रम राबवत आहोत. 'बुचकेवाडी' हा असाच एक वैशिष्ट्यपूर्ण प्रकल्प आहे. 'आदर्श गाव' म्हणजे विकास पावलेलं केवळ एक बेट असावं असं आम्हाला वाटत नाही. म्हणून बुचकेवाडी हे रूढार्थाने 'आदर्श गाव' नाही, तर गांधीजींच्या 'ग्राम स्वराज्य' या संकल्पनेतील स्वयंपूर्ण गाव म्हणून आम्ही या गावाच्या विकासाकडे पाहत आलो आहोत.

२००० सालापासून लुपिन फाउंडेशनने महाराष्ट्रात ग्रामविकासाचं प्रकल्प राबवण्यास सुरुवात केली. सिंधुदुर्ग जिल्ह्यापासून सुरुवात करत पुणे, धुळे, औरंगाबाद नि नंदुरबार या जिल्ह्यांमध्ये कामाचा विस्तार झाला. या कामांमध्ये बुचकेवाडी अर्थात वैष्णवधाम या गावात उभं राहिलेलं काम अनेक अर्थांनी वैशिष्ट्यपूर्ण आहे. ग्रामविकास म्हणजे केवळ रस्ते, पाणी, आरोग्यसुविधा अशा भौतिक संसाधनांचा विकास नव्हे; तर प्रत्यक्ष त्या गावातील स्त्री–पुरुषांसह शेतजमीन, जंगल, भूजल नि गोधनाचाही विकास झाला तर खऱ्या अर्थाने विकासाच्या सर्व मिती पूर्ण होतात, हे बुचकेवाडीने आपलं रूपांतर वैष्णवधाममध्ये घडवून सिद्ध केलं आहे. ही पुस्तिका या विकासाचे टप्पे, पार्श्वभूमी नि प्रभाव यांचा दस्तऐवज आहे. सामूहिक नेतृत्व ग्रामविकासामध्ये किती मध्यवर्ती भूमिका निभावते याचा प्रत्यय या पुस्तिकेतून वाचकांना येईल. या पुस्तिकेच्या माध्यमातून प्रत्येक खेड्याला कात टाकून विकासवाट चालण्याची प्रेरणा मिळावी ही सदिच्छा!



# पार्श्वभूमी बुचकेवाडी ते वैष्णवधाम प्रवासाची

पुणे-नाशिक महामार्गावरील नारायणगाव एस.टी. स्टँडपासून पश्चिमेला एक रस्ता जातो. या वाटेने साधारणतः सोळा कि. मी. आत गेलो की आपण पारुंडे या गावाजवळ पोहोचतो. तिथून आणखी पुढे गेल्यावर डोंगर अधिक जवळ येऊ लागतात. एक बंधारा ओलांडला की मग वस्ती दिसू लागते. ही वस्ती म्हणजे बुचकेवाडी...किल्ले शिवनेरी व भीमाशंकर यांच्या आडोशाला वसलेलं एक गाव. गावात ३१७ कुटुंबं असून लोकसंख्या आहे १६२५ इतकी.

अशा या छोट्याशा खेड्याने राज्य शासनाचे विविध पुरस्कार पटकावले आहेत...

- २००९-१० सालचा महात्मा गांधी तंटामुक्त गाव पुरस्कार
- २००८-०९ सालचा निर्मल ग्राम पुरस्कार
- २०१२-१३ सालचा पुणे जिल्हा परिषदेचा डोंगरी भागातील आदर्श कृषी ग्राम अभियानातील प्रथम क्रमांकाचा पुरस्कार
- तसेच २०१३-१४ साली संत तुकाराम वनग्राम अभियानात पुणे जिल्ह्यात या गावाने प्रथम क्रमांक मिळवला आहे. याशिवाय याच अभियानात २०१३-१४ सालासाठी बुचकेवाडी-वैष्णवधामला राज्यस्तरावर प्रोत्साहनात्मक पुरस्कारही मिळाला आहे.

२००८ सालापासून या गावात संपूर्ण दारूबंदी आहे. हे गाव 'आदर्श' असलं तरी ते इतर खेड्यांपेक्षा फार काही 'वेगळं' नाही. म्हणूनच ते इतर गावांसाठी प्रगतीचा एक 'रोडमॅप' ठरू शकतं.

सामूहिक-परस्परावलंबी जीवन हे भारतीय खेड्यांचं वैशिष्ट्यच आहे. या वैशिष्ट्यालाच सकारात्मक बंधुभावाची जोड देत बुचकेवाडी गावातील प्रत्येकाचा उत्कर्ष घडून येत आहे...गावातील स्त्री-पुरुषांचा उत्कर्ष तर इथे आकाराला येत आहेच; सोबतीने गावाभोवतालचं जंगल, शेतजमीन नि उपलब्ध पाण्याचंही संवर्धन व व्यवस्थापन हे गाव करत आहे. महाराष्ट्रातील कुठल्याही एका गावासारख्या या खेड्याने परिवर्तनाची पायवाट कशी चोखाळली याचा हा लेखाजोखा...

# बुचकेवाडी : विकासपर्वापूर्वीची



कुठल्याही खेड्यातील शेतकऱ्यांप्रमाणेच बुचकेवाडीतले शेतकरीही स्वप्नं रंगवत जगत. यंदा वावर खूप पिकणार, अशी चित्रं मनातल्या मनात काढत बसत. पण दरवर्षी एखादं नक्षत्र दगा देई. कधी आर्द्रा, कधी चित्रा, कधी हस्ताचा पूर्वार्ध...

दरवर्षी निराशाच पदरी पडे. पोटापुरता भात नि नागली तेवढी पिकत असे. पण बुचकेवाडीच्या शेतकऱ्यांना स्वप्नं मात्र पडतच राहायची. जशी कुठल्याही शेतकऱ्याला पडतात तशीच... यंदा जत्रेत आपण एक फाकडू छकडा अन् बैलगाडा घेऊ. छकड्याच्या धुरांना बारकाल्या घंटा असतील. चाकांचे आरे रंगवलेले असतील. नक्षीदार छकड्याला देखणी बैलजोडी जुंपलेली असेल, टोकदार शिंगांची. पुठ्ठ्यावर हात ठेवताक्षणी धूम धूम पळणारी...असे नाना संकल्प इथला शेतकरी मनातल्या मनात रंगवत असे. पण शेतकऱ्यांची स्वप्नं खरी होत असतात का?

अशा शेतकऱ्यांच्या बायका तरी काय स्वप्नं पाहत असतील? बुचकेवाडीतल्या महिला दिवसभर पाण्यासाठी वणवण करायच्या. कोस-दोन कोसांवरून दोन-दोन हंडे आणायचे. दिवसातला अर्धा वेळ यातच जायचा. मग शेतातली कामं, चुलीपुढची कामं, पै-पाहुण्यांची ऊठबस... सगळं करता करता पार कंबरडं मोडायचं. यापेक्षा बरे दिवस कधी येतील, असं बुचकेवाडीतल्या कुणाच्या मनात ही येणं त्या काळी अजिबात शक्य नव्हतं.

अशा या डोंगराच्या उशापायथ्याला वसलेल्या वाडीचं एक वैशिष्ट्य होतं. 'डबेवाल्यांची बुचकेवाडी' अशी या गावाची ओळख होती. मुंबईतील डबे पोहोचवणारे कामगार सुप्रसिद्ध आहेत. या कामगारांच्या नियोजनकौशल्याबद्दल त्यांना नावाजलं जातं. पण हे काम खूप कष्टाचं असतं. सहसा अल्पशिक्षित, कमालीचे शारीरिक कष्ट सोसण्याची तयारी असणारे कामगार डबेवाल्यांचं काम करतात. तर बुचकेवाडीतून घरटी एक तरी माणूस मुंबईला या रोजगारात होता. काही लोक गिरणी कामगारही होते. पण बहुतेक कुटुंबांना मुंबईतील चाकरमान्यांचा आधार होता. कारण शेती फारशी पिकत नव्हती.

बुचकेवाडीभोवतालच्या जमिनीचं स्वरूप असं, की अर्धा फुटभर मातीचा थर संपला की सगळी खडकाळ जमीन. त्यामुळे पावसाचं पाणी जमिनीत मुरत नव्हतं. परिणामी, कसंबसं तगत जगत बुचकेवाडीची गुजराण सुरू होती. अगदी १९९९ ते २००० सालापर्यंत हे गाव अगदी मागास होतं. गावात एखादी चारचाकी घेऊन कुणी आलं तर सगळे ती गाडी पाहायला गर्दी करायचे, इतकं हे गाव विकास, प्रगती यापासून वंचित होतं.



# आशा पल्लवित झाल्या...

**बु**चकेवाडी ही मूळ पारुंडे या गावाची वाडी होती. गावाजवळ १९७२ साली बांधलेला एक पाझर तलाव होता. साधारणतः पौष-माघापर्यंत तो आटायचा. या तलावाचं पाणी शेतीसाठी उपयोगात येत नव्हतं. पण बुचकेवाडीच्या मनात आशा निर्माण झाली १९८९ साली. या वर्षी पारुंडे गावाजवळ एक लघू पाटबंधारा मंजूर झाला; पण या बंधाऱ्याखाली बुचकेवाडीतल्या शेतकऱ्यांची जमीन जाणार होती. बुचकेवाडी बंधाऱ्याच्या वरच्या बाजूला वसलेली. बंधाऱ्याच्या पाण्याचा लाभ होणार पारुंड्याच्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना. म्हणजे आता बुचकेवाडीच्या डोळ्यांदेखत बंधाऱ्याखालचे शेतकरी बागायतदार होणार होते. बुचकेवाडीला मात्र उपाशीपोटी त्यांचं तोंड पाहत बसावं लागणार होतं.

बंधाऱ्याचं काम सुरू झालं; पण बंधाऱ्यामुळे भूमिहीन झालेले बुचकेवाडीतील शेतकरी अस्वस्थ होते. या शेतकऱ्यांनी आंदोलन सुरू केलं. वातावरण तापलं. पण पारुंडेकरांनी 'बंधाऱ्यामुळे भूमिहीन होणाऱ्यांना लाभक्षेत्रात जमीन देऊ' अशी हमी बाँडपेपरवर दिली तेव्हा बुचकेवाडीचा विरोध मावळला. बंधारा झाला, पाणी साचलं; पण पारुंडेकरांनी आपला शब्द फिरवला. बुचकेवाडीतील भूमिहीन शेतकऱ्यांना लाभक्षेत्रात जमिनी नाकारल्या. वचनभंग झालेली बुचकेवाडी अपमानित झाली. पण करणार काय?

बुचकेवाडी संयमाने बंधाऱ्याकडे पाहत राहिली. या संयमाचं एक कारण म्हणजे या गावाला लाभलेला भागवत संप्रदायाचा वारसा. गावातली ८० टक्के कुटुंबं माळकरी. पंचक्रोशीत बुचकेवाडीचा तसा एक आदरपूर्वक आध्यात्मिक दबदबा होता व आहे. बुचकेवाडीमध्ये एक थोर सत्पुरुष होऊन गेलेत. त्यांचं नाव गुरुवर्य कोंडाजीबाबा डेरे. जुन्नर, खेड, आंबेगाव या तालुक्यांमध्ये कुठेही काल्याचं कीर्तन असल्यास गुरुवर्य डेरे महाराजांनाच बोलावलं जायचं. संतपुरुष असाच गुरुवर्य डेरे महाराजांचा लौकिक होता.



**गुरुवर्य कोंडोजीबाबा डेरे**

कदाचित गुरुवर्य डेरे महाराजांची पुण्याईच बुचकेवाडीच्या कामी आली असावी. बंधाऱ्याच्या कामाला संमती देताना पारुंडेकरांशी झालेल्या करारात एक अट होती; बंधाऱ्यातील ४० टक्के पाणी बुचकेवाडी 'लिफ्ट' करून उचलू शकत होती.

मग बुचकेवाडीतील शेतकऱ्यांनी आठ 'पाणीवापर सोसायट्या' निर्माण केल्या. ८१ शेतकरी या प्रयोगात सहभागी झाले. पहिल्यांदाच पावसाच्या पाण्याव्यतिरिक्त बुचकेवाडीची १२० हेक्टर जमीन ओलिताखाली आली. ■

# अपेक्षा उंचावल्या...

**पा**ण्याच्या उपलब्धतेमुळे बुचकेवाडीमध्ये नवं चैतन्य आलं. आता शेतकरी भाजीपाला, टोमॅटो, झेंडू, बटाटा, भुईमूग, कांदा अशी पिकं घेऊ लागले. डोंगरपायथ्यापर्यंतच्या जमिनींमध्ये बंधाऱ्यातून पाणी आलं; पण वर्षातून आठ महिनेच हे पाणी मिळू शकत होतं. पण एक गोष्ट चांगली घडली. आता बुचकेवाडीत पिकलेला भाजीपाला मुंबईच्या बाजारात जाऊ लागला. थोडे बरे दिवस आले. गावात समृद्धीच्या पाठोपाठ स्पर्धा, हेवेदावेही येऊ लागतात. बुचकेवाडी मात्र या नियमाला अपवाद ठरली. शेतकऱ्यांना चांगल्या दिवसांची चाहूल लागताच बुचकेवाडीने एक अनोखा निर्णय घेतला. हा निर्णय होता 'गावफंड' निर्माण करण्याचा...

## बुचकेवाडी गावफंड : अनोखी संकल्पना

सर्वच गावांमध्ये वर्षातून एकदा गावजत्रा असते. तसेच गावाचे काही ठरलेले सामुदायिक सण असतात. अशा सामुदायिक कार्यक्रमांसाठी गावातून वर्गणी काढली जाते. बुचकेवाडीमध्येही दरवर्षी सप्ताहाची परंपरा आहे. पंचक्रोशीतील नागरिक या सोहळ्याला येतात. या कार्यक्रमासाठी बुचकेवाडीतही घरटी वर्गणी जमवली जायची. पण गावातले शेतकरी भाजीपाला पिकवू लागल्यापासून बुचकेवाडीने एक अभिनव निर्णय घेतला. प्रत्येक हंगामात शेतकऱ्याकडून व्यापाऱ्यांकडे जाणारं प्रत्येक पोतं, भाजीपाल्याची पेटी यामागे एक रुपया 'गावफंडा'त जमा करायचा. गावातल्या प्रत्येकाने हा निर्णय हसतमुखाने स्वीकारला.

या गावफंडात इतकी रक्कम जमा झाली की सप्ताहाच्या सोहळ्यासाठी सढळ खर्च करूनही रक्कम शिल्लक राहू लागली. ही शिल्लक रक्कम गावातील गरजू शेतकऱ्यांना अगदी नाममात्र व्याजदराने कर्जाऊ दिली जाऊ लागली. कर्ज देताना केवळ तीन निकष पाहिले जाऊ लागले: कर्ज घेणाऱ्याची गरज, कर्ज फेडण्याची क्षमता नि गावातील दोन व्यक्तींचा जामीन. ■



**सुदाम सदाशिव डेरे**
माजी सरपंच

**"काही वर्षांपूर्वी बुचकेवाडीतल्या शेतकऱ्यांनी भाजीपाल्याच्या एका डागामागे एक रुपया गावफंडात जमा केला. त्यातून वर्षाला दीड लाख रुपये जमू लागले. गावफंडाची ही रक्कम सध्या चाळीस लाखाच्या जवळपास झाली आहे. आमच्या एवढ्याशा छोट्या वाडीने एवढी रक्कम केवळ एकमेकांवरील विश्वासाच्या आधारावर जमवली. ही केवळ रक्कम नसून गावातल्या प्रत्येकाच्या ऋणानुबंधाची ठेव आहे!"**

*'फंड' गावोगाव आढळतात, पण बुचकेवाडीतील फंडाचं वेगळेपण म्हणजे यासाठी जमा होणारा निधी गावातील शेतकऱ्यांच्या शेतमालावर करसदृश देणगीतून उभा राहतो. तसंच ही देणगी गावातील सप्ताहाच्या वर्गणीसाठी असल्याने तिला सामूहिक जबाबदारीची किनार आहे. या निधीतून दिलं जाणारं कर्ज एका वर्षापुरतंच असतं. ठराविक दिवशी त्याची परतफेड करणं बंधनकारक आहे. गावफंडाच्या निधीचा जमाखर्च व वितरण सार्वजनिकरीत्या पारदर्शी पद्धतीने होतं.*

*गावफंडाच्या प्रयोगामुळे बुचकेवाडीला मिळालं सुरक्षा कवच!*

- *गावफंड संकल्पनेमुळे गावात सामूहिक निर्णयक्षमता बळावली.*
- *खासगी सावकारांकडे बुचकेवाडीतील शेतकऱ्यांना जायची गरज उरली नाही.*
- *शेतकऱ्यांमध्ये परस्पर सौहार्द वाढलं.*
- *शेतकऱ्यांना बँकांकडून कर्ज घ्यायचं असल्यास सात-बाराचा दाखला इत्यादी कागदपत्रांची पूर्तता करावी लागते. गावफंडातून मिळणारं कर्ज या कटकटींपासून मुक्त आहे.*
- *गावफंडाचं कर्ज शेतकरी बुडवत नाहीत. कारण हा निधी त्यांनीच, त्यांच्या घामाच्या पैशातून उभारला आहे.*
- *गावात विविध विकासकामांना मंजुरी देताना विकासकामांसाठी अपेक्षित खर्चाच्या १५ टक्के निधी गावकऱ्यांनी जमवावा अशी तरतूद आहे. बुचकेवाडीने अशा निधीची तरतूद गावफंडातून केल्याने गावात अनेक विकासयोजना आल्या.* ■

# आणि बुचकेवाडीची गाडी विकासाच्या ‘ठेसना’वर आली...



**१** जानेवारी १९९२ रोजी पारुंडे ग्रामपंचायतीपासून वेगळं होत बुचकेवाडीची स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन झाली. पाणीवापर सोसायट्या, स्वतंत्र ग्रामपंचायत नि गावफंड यामुळे बुचकेवाडीला आपोआपच काही वैशिष्ट्यं प्राप्त झाली. ती अशी–


- पाणीवापर सोसायट्यांमुळे शेतकऱ्यांना पाण्याची उपलब्धता नि त्याचा सामूहिक वापर याची जाणीव निर्माण झाली होती.
- गावफंडातील निधीच्या विनियोगाबाबत, कर्जवाटपाबाबत सामूहिक निर्णय सर्वमताने होत असल्याने सामूहिक निर्णयक्षमता दृढ झाली होती.
- स्वतंत्र ग्रामपंचायतीची मान्यता मिळाल्याने आता गावात विकासयोजना राबवण्यासाठीही सामूहिक निर्णय घ्यावे लागणार होते.
- ग्रामपंचायतीच्या माध्यमातून २००० सालापर्यंत बुचकेवाडीतील शेतकऱ्यांच्या जमिनींचं सपाटीकरण, मजगीकरण अशी कामंही झाली होती. शासनाच्या कृषी विभागामार्फत दोन मातीचे बंधारे, दोन सिमेंट बंधारे, एक कोल्हापूर पद्धतीचा बंधारा ही कामंही झाली होती. अशा प्रकारे बुचकेवाडी विकासाच्या रस्त्यावरील एका निर्णायक टप्प्यावर आली होती. पण अजूनही काही मूलभूत बाबींकडे गावाचं लक्ष गेलं नव्हतं. त्या बाबी अशा–

- गावाभोवतालच्या डोंगरांतून उगम पावणारे जलप्रवाह वाहून कुकडी नदीला मिळतं. या पाण्याचा वापर गावाच्या विकासासाठी होऊ शकतो, ही बाब अजून कोणाच्या ध्यानात आली नव्हती.
- डोंगरउतारावरून पावसाचं पाणी वाहून गेल्यावर इथल्या शेतकऱ्यांना पीकनिवडीसाठी जास्त पर्यायच राहत नव्हता.
- परिसरात जनावरांसाठी ओल्या व सुक्या चाऱ्याची कमतरता होती; पण या समस्येवर कुणीही विचार केला नव्हता.
- डोंगउतारावरील जमिनीची पावसाने धूप होत होती.
- गावाभोवतालच्या जंगलातून सरपणासाठी वृक्षतोड होत असल्याने माती पावसाच्या पाण्यासोबत वाहून जाऊन जमिनीचा पोत हलका झाला होता.
- परिणामी, अत्यल्प कृषी उत्पादन व तीव्र पाणीटंचाई या समस्या गावाची पाठ सोडत नव्हत्या.
- २००७–०८ या वर्षी पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली. शेतातली पिकं जळून गेली. बंधाऱ्यांच्या पाण्यावरून पारुंडे गावाशी संघर्ष वाढले होते.



**सुरेश गायकवाड**
**माजी सरपंच**

**“१९९४–९५ साली मी कालिकामाता प्रतिष्ठान आणि वनराई या संस्थांच्या मार्फत शेततळ्यांच्या एका प्रकल्पावर काम केलं होतं. शिवाय अण्णा हजारे यांच्या राळेगणसिद्धीमधील कार्याचीही मला माहिती होती. त्यामुळे पाणलोट क्षेत्रविकासातून गावाचा विकास होऊ शकतो हे मला पटलं होतं. पण सर्व गावकऱ्यांना ते पटवण्यासाठी बरीच मेहनत घ्यावी लागली...”**



# लुपिन फाउंडेशन : ग्रामविकासाची भूमिका

*'जेव्हा कधी तुम्ही संभ्रमात असता, आपण योग्य मार्गाकडे जात आहोत ना याबद्दल साशंक असता तेव्हा स्वतःसोबत खालील चाचणी करा-*

*तुम्ही पाहिलेल्या अत्यंत गरीब मनुष्याचा चेहरा आठवा नि स्वतःला विचारा, तुम्ही उचललेलं प्रत्येक पाऊल त्या दरिद्रीनारायणाच्या हिताचं आहे का? तुम्ही करणार असलेली कृती त्याच्यासाठी खरंच हितकारक आहे का? तुमच्या कृतीमुळे त्याचं स्वातंत्र्य अबाधित राहील ना? तुमच्या हस्तक्षेपामुळे ती व्यक्ती 'स्वराज्य' व दारिद्र्यमुक्तीच्या दिशेने पुढे सरकेल ना?*

*या प्रश्नांची उत्तरं सकारात्मक असतील तर तुमचा संभ्रम आपोआप नष्ट होईल.'*

## *-महात्मा गांधी*

महात्मा गांधी यांचा वरील मंत्र लुपिन फाउंडेशनने राबवलेल्या विकास उपक्रमांचा पाया आहे असं म्हणता येईल. याशिवाय लुपिन फाउंडेशन ग्रामविकासाचे उपक्रम राबवताना खालील तीन तत्त्वं अत्यावश्यक मानते-



# लुपिन फाउंडेशनच्या रूपाने पाणलोट क्षेत्रविकासाची गुरुकिल्ली मिळाली...



रावसाहेब बढे

२००९ साली नाबार्ड पुरस्कृत इंडो-जर्मन पाणलोट क्षेत्रविकास प्रकल्प राबवण्यासाठी लुपिन फाउंडेशनने बुचकेवाडीची निवड केली.

''लुपिन फाउंडेशनने बुचकेवाडी व मुथाळणे या दोन गावांची निवड पाणलोट क्षेत्रविकास प्रकल्प राबवण्यासाठी केली. सुरुवातीचे सहा महिने काम खूप संथगतीने होत होतं. पण सुरेश गायकवाड या बी. एस्सी. झालेल्या अनुभवी व्यक्तीने व पाणलोट क्षेत्रविकास समितीचे अध्यक्ष शिवाजी डेरे यांनी गावकऱ्यांना या कामाचं महत्त्व पटवून देण्यात खूप महत्त्वाची भूमिका निभावली. त्यानंतर या गावाने मागे फिरून पाहिलेलं नाही.''

- रावसाहेब बढे, लुपिन फाउंडेशन, राज्य प्रकल्प समन्वयक

'लुपिन ह्युमन वेल्फेअर अँड रिसर्च फाउंडेशन' ही सेवाभावी संस्था ग्रामीण भागांचा सर्वांगीण विकास व दारिद्र्यनिर्मूलन यासाठी कार्यरत आहे. या संस्थेची स्थापना डॉ. देशबंधू गुप्ता यांनी २ ऑक्टोबर १९८८ मध्ये केली. लुपिन लि. हा भारतातील एक अग्रणी औषधनिर्मिती उद्योग आहे. या उद्योगाचं सामाजिक उत्तरदायित्व निभावण्याच्या हेतूने 'लुपिन ह्युमन वेल्फेअर अँड रिसर्च फाउंडेशन' कार्यरत आहे.

राजस्थान, मध्य प्रदेश, उत्तराखंड, गुजरात व महाराष्ट्र या पाच राज्यांमध्ये संस्थेचं कार्यक्षेत्र विस्तारलेलं आहे. या संस्थेने सन २००० पासून महाराष्ट्रातील सिंधुदुर्गमध्ये विकास प्रकल्प राबवण्यास सुरुवात केली. त्यानंतर पुणे जिल्ह्यात प्रामुख्याने पाणलोट क्षेत्रविकास, रोजगारनिर्मिती, कृषिविकास, पशुधन विकास, पायाभूत सुविधांची उभारणी, आरोग्य, शिक्षण अशा अनेकविध क्षेत्रांत कार्य सुरू केलं. बुचकेवाडीची विकास प्रकल्प राबवण्यासाठी निवड करताना लुपिन फाउंडेशनने पुढील निकषांचा विचार केला-

- पाण्याची तीव्र टंचाई, पण गावाला १००० ते १५०० हेक्टरपर्यंत पाणलोट क्षेत्र.
- भौगोलिक व तांत्रिकदृष्ट्या एक मुख असणारा पाणलोट आणि भूजल पुनर्भरण होण्यास पूरक पाणलोट.
- मातीची धूप व खालावलेल्या पाणी पातळीमुळे अत्यल्प कृषी उत्पादन.
- आदिवासी समाजाची लोकवस्ती.
- पडीक व अवनत जमिनीची व्याप्ती आणि तीव्रता असणारं गाव.
- गावातील महिला व इतर सर्वांचीच सामूहिक सहभाग देण्याची तयारी.

*पाणलोट क्षेत्रविकास प्रकल्पाची मंजुरी मिळण्यासाठी सुरुवातीला गावाने श्रमदान करणं अपेक्षित असतं. समजा, गावात ३०० कुटुंबं असल्यास गावातून १२०० मनुष्यदिवस श्रमदान झाल्यानंतरच पाणलोट क्षेत्रविकास प्रकल्पांना मंजुरी व निधी मिळतो. बुचकेवाडीतील सर्वांना या कामाचं महत्त्व पटलं नव्हतं. ते पटवण्यासाठी खास प्रयत्न करण्याची गरज होती. सुरुवातीचे सहा महिने अशा प्रयत्नांतच गेले.*

# पाणलोट क्षेत्रविकास कार्यक्रमांची पार्श्वभूमी

इंडो-जर्मन पाणलोट क्षेत्रविकास कार्यक्रम हा भूजलवृद्धी व नैसर्गिक संसाधनांच्या पुनर्वाढीसाठी राबवला जाणारा कार्यक्रम आहे. हा कार्यक्रम गावातील पाणलोट क्षेत्रविकास समिती स्वयंसेवी संस्थेच्या सहकार्याने राबवते. हा कार्यक्रम नॅशनल बँक फॉर ॲग्रिकल्चर अँड रूरल डेव्हलपमेंट (नाबार्ड) यांचे अर्थसाहाय्याने राबवला जातो.

**इंडो-जर्मन पाणलोट क्षेत्रविकास कार्यक्रमाची उद्दिष्टं -**

- गावाभोवतालच्या पाणलोट क्षेत्राचा सर्वांगीण विकास. त्या माध्यमातून स्थानिक रहिवाशांसाठी उदरनिर्वाहाच्या साधनांमध्ये वाढ.
- ग्रामस्थांच्या सक्रिय पुढाकारातून पर्यावरण संवर्धन.
- चिरंतन विकासासाठी जनचळवळीची उभारणी.
- पाणलोट क्षेत्रविकास कार्यक्रमात सहभागी घटकांची भूमिका-
- सर्वप्रथम ग्रामसभा हा कार्यक्रम राबवण्याबाबत मान्यतेचा ठराव करते.
- ग्राम पाणलोट क्षेत्रविकास समिती या कार्यक्रमाचं नियोजन व अंमलबजावणी करते.
- कार्यक्रम कालावधीत स्वयंसेवी संस्था ग्राम पाणलोट क्षेत्रविकास समितीस मार्गदर्शन व सहकार्य करते.
- संबंधित शासकीय खाती, तांत्रिक साहाय्य करणाऱ्या संस्था व कृषी विद्यापीठांची गरजेनुसार मदत घेतली जाते.
- नाबार्ड व रिसोर्स सपोर्ट ऑर्गनायझेशन (आरएसओ) यांच्याकडून तांत्रिक प्रशिक्षण तसंच कार्यक्रम योग्य राबवला जाईल यासाठीची भूमिका निभावतात.

लुपिन फाउंडेशनने पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यामध्ये बुचकेवाडीशिवाय अन्य एका आदिवासी गावामध्ये वरील तत्त्वांवर आधारित पाणलोट क्षेत्रविकास कार्यक्रम राबवला आहे.





# विकासवाटेवरील पहिली पावलं...

## ग्राम पाणलोट क्षेत्रविकास समितीची स्थापना :

बुचकेवाडीमध्ये कार्यक्रम राबवण्यासाठी सर्वप्रथम ग्राम पाणलोट क्षेत्रविकास समितीची स्थापना करण्यात आली. गुरुवर्य कोंडाजीबाबा डेरे हे या गावाचं श्रद्धास्थान. त्यामुळे त्यांचंच नाव या समितीला देण्यात आलं. त्यामुळे 'गुरुवर्य कोंडाजीबाबा पाणलोट क्षेत्रविकास समिती'ला एक सात्त्विक वलय प्राप्त झालं.

## गावबैठका

गावालगतच बंधारा असल्याने सुरुवातीला गावकऱ्यांना पाणलोट क्षेत्रविकास कामांचं महत्त्व पटत नव्हतं. पण लुपिन फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांची चिकाटी व ग्राम पाणलोट क्षेत्रविकास समितीच्या पाठपुराव्याने अनेक गावबैठका झाल्या. त्यातून गावकऱ्यांची कार्यक्रमासाठी मनोभूमिका निर्माण करण्यात आली.



गावातील सर्व लोक सुरुवातीला गावबैठकांना उत्साह दाखवत नसत. त्यामुळे गावातल्या मध्यवर्ती ठिकाणावर एकच बैठक घेण्याऐवजी प्रत्येक वाडीवर स्वतंत्र बैठका घेण्याचं धोरण आखलं गेलं. अशा छोट्या बैठकांमध्ये लोक जास्त खुलत, आपल्या मनातील शंका विचारत. या शंकांचं निरसन करण्यासाठी माहितीपत्रकं, लघुपट, इतर गावांमधील कामांच्या यशोगाथा यांचा आधार घेतला गेला. अशा बऱ्याच प्रयत्नांनंतर पाणलोट क्षेत्रविकास कामांसाठी गावाची तयारी झाली.

## अभ्यास सहली

महाराष्ट्रात काही गावांनी पाणलोट क्षेत्रविकास कार्यक्रमातून उत्कर्ष साधला आहे. ही गावं नेहमीच इतरांसाठी आदर्श ठरली आहेत. या गावांचा अनुभव समजावून घेण्यासाठी बुचकेवाडीतील ग्रामस्थांच्या राळेगणसिद्धी, हिवरेबाजार, निढळ (सातारा), म्हसवंडी (संगमनेर) या गावांना अभ्यास सहली झाल्या.

बऱ्याचदा अभ्यास सहली या केवळ 'सहली' होतात. तसं होऊ नये याकरता लुपिनच्या कार्यकर्त्यांनी अभ्यास सहलींनंतर गावात आढावा बैठका घेतल्या. या बैठकांमध्ये सहलीतील सहभागींचे अनुभव, मिळालेली नवी माहिती यावर चर्चा घडवण्यात आल्या. परिणामी, अभ्यास सहलींचा उपक्रम गावकऱ्यांच्या सक्रिय सहभागाला पूरक ठरला.

## ग्रामसभेत ठरावाला मंजुरी

अनेक गावबैठका, अभ्यास सहली, पाणलोट क्षेत्रविकास समितीचे प्रयत्न या सर्वांना अखेर यश आलं. गावाने श्रमदानाची तयारी दाखवली. पाणलोट क्षेत्रविकासकामांसाठी घरटी चार दिवस श्रमदान केलं जाईल, असा ठराव ग्रामसभेत करण्यात आला. या टप्प्यावर गावातील विकासकामांनी खरी गती घेतली.

# आरंभीची आव्हानं नि बुचकेवाडीने केलेल्या उपाययोजना....

**गा**वातील धार्मिक कार्यात लोक जितक्या समरसतेने सहभागी होतात तितक्या उत्स्फूर्तपणे विकास उपक्रमांमध्ये होतातच असं नाही. बुचकेवाडीमध्येही हाच अनुभव आला. पण त्यावर या गावाने वैशिष्ट्यपूर्ण उपाय शोधले. ते इतरांसाठी पथदर्शक ठरतील.

| आव्हाने | उपाय |
|---|---|
| लोक मीटिंगला येतात पण श्रमदानाला दांडी मारतात. | • सर्व गावांमध्ये आठवड्यातला एक दिवस 'मोडा' म्हणून पाळला जातो. या दिवशी कुणीही शेतात कामाला जात नाही. बुचकेवाडीमध्ये सोमवारी हा मोडा पाळला जातो. हा दिवस श्रमदानासाठी निवडल्याने गावातील सर्वांचा सहभाग निचित झाला.<br>• श्रमदानाचा दिवस ठरल्यावर त्याच्या आदल्या रात्री प्रत्येक घरातून १०० रुपये अनामत र क्क म घेण्यात आली. दुसऱ्या दिवशी त्या कुटुंबातील एका व्यक्तीने श्रमदान केल्यानंतर हे पैसे त्यांना परत केले गेले.<br>• श्रमदानात सहभाग देणार नाहीत अशा कुटुंबांना ग्रामपंचायतीमधून दाखले, रेशन दुकानातून धान्याची बंदी जाहीर करण्यात आली. |
| शेतकरी शेताजवळ चर खोदू देत नसत. | चर खोदल्यावर त्याची माती बांधावर टाकली जाते, त्यामुळे तेवढी जमीन वायाला जाते, या समजुतीमुळे शेतकरी चर खोदायला विरोध करत. पण बांधांमुळे जमिनीची धूप थांबते, पाण्याचं संवर्धन होतं शिवाय, या बांधांवर चारापीक घेतल्यास जनावरांना उत्तम चाराही मिळतो, हे पटवल्यावर शेतकऱ्यांचा विरोध मावळला. |
| पाणलोट क्षेत्रविकासकामांसाठी स्थानिक मजुरांना रोजाने मजुरी करण्याची पद्धत माहीत असते. दिवसभर कामाची घनमापन पद्धतीने मजुरी मिळते.<br>जमिनीची बांध-बंधिस्ती केल्यानंतर दगडी सांडवा काढावा लागतो. पण त्यासाठी दगड उपलब्ध होत नव्हते. | साधारणतः १५० रुपये मिळतात. मात्र, घनमापन पद्धतीने मिळणारी मजुरी 'काम तसा दाम' या तत्वाने मिळते. आपण जास्त काम केलं तर रोजाने पैसे मिळतात त्यापेक्षा जास्त मजुरी मिळू शकते, हे मजुरांना पटवण्यात आलं. त्यासाठी खास बैठका घेतल्या गेल्या.<br>ही समस्या सोडवण्यासाठी पर्यायी मार्ग निवडण्यात आला. १ मी. लांबी व २० सें.मी. रुंदीचे सिमेंट पाइप बसवून सांडवे काढले गेले. |
| चर खोदल्यानंतर त्यातून काढलेली माती मोकळीच पडत होती. अशी माती वाहून जाऊन जमिनीची धूप होणार होती. | चरातून निघालेल्या मातीच्या ढिगाऱ्यावर अंजन, स्टायलो इ. जातींच्या गवतांची लागवड करण्यात आली. त्यामुळे जनावरांसाठी पौष्टिक चारा उपलब्ध झालाच, शिवाय मातीही वाहून जाण्यापासून वाचली. |
| नाल्याला आडवे दगडी बांध घालण्यासाठी मोठे दगड नव्हते. | ही समस्या सोडवण्यासाठी शेतकऱ्यांनी आपापल्या शेतातील दगड विनामोबदला दिले. |

# पाणलोट क्षेत्रविकास: सर्वांगीण विकासाला भिडण्याची गुरुकिल्ली

**गा**व एकदा श्रमदानाला तयार झाल्यानंतर बुचकेवाडीमध्ये विकासकामांना वेग आला. लुपिन फाउंडेशनने नाबार्डच्या सहकार्यातून पाणलोट क्षेत्रविकासाचं नियोजन आखायला सुरुवात केली. माथा ते पायथा या सूत्राने पाणलोट क्षेत्रविकासाचं काम सुरू झालं. सीसीटी अर्थात सलग समतोल चर खोदणे, वृक्षारोपण, वॅट व लूज बोल्डरच्या माध्यमातून डोंगरउतारावरील वाहून जाणारी माती अडवणे, जाळीचे बंधारे बांधून ओढ्या-नाल्यांमधून वाहून जाणारं पाणी अडवणे, सिमेंट बंधारे, माती बंधारे अशी अनेकविध कामं गुरुवर्य कोंडाजीबाबा डेरे पाणलोट क्षेत्रविकास समितीच्या नेतृत्वात पार पडली.



# ‘पाणी अडवा, पाणी जिरवा’ या कामाचा प्रभाव

११८.६९ हेक्टर पडीक क्षेत्रावर व २४८.६७ हेक्टर जंगल क्षेत्रावर जलसंधारणाची विविध कामं पार पडली. त्यामुळे
सुमारे २३.६७ हेक्टर पडीक क्षेत्र कृषिलायक झालं.
रब्बी हंगामामध्ये १४९.३७ हेक्टर क्षेत्रावर सिंचनसुविधा निर्माण झाली.

**कृषी उत्पादनात वाढ!**

| उत्पादनाचा प्रकार | पाणलोट क्षेत्रविकास कार्यक्रमाआधी उत्पादन (क्विंटल) | पाणलोट क्षेत्रविकास कार्यक्रमानंतर उत्पादन (क्विंटल) |
|---|---|---|
| तृणधान्य | ७१८१.६१ | ११०२०.०० |
| डाळ | ११६५.८० | १५७०.०० |
| तेलबिया | २६.५१.४२ | २७८०.०० |
| फळ उत्पादन | ०.०० | ९२६.०० |
| भाज्या | १८०४१.०२ | २२१३०.०० |
| फुलशेती | ९८२.२२ | ११३५.०० |







| पशुधनामध्ये झाली भरभराट! | | |
|---|---|---|
| जनावरांचा प्रकार | पाणलोट क्षेत्रविकास कार्यक्रमाआधी (एकूण संख्या) | पाणलोट क्षेत्रविकास कार्यक्रमानंतर (एकूण संख्या) |
| बैल | २७६ | २९२ |
| म्हशी | १५२ | २०४ |
| संकरित गाई | ८४ | १२६ |
| देशी गाई | १८९ | ६३ |
| बकऱ्या | ५६० | २८० |





| चाऱ्याची उपलब्धता | | | | |
|---|---|---|---|---|
| स्रोत | पाणलोट क्षेत्रविकास कार्यक्रमाआधी | | पाणलोट क्षेत्रविकास कार्यक्रमानंतर | |
| | क्षेत्र (हेक्टर) | वार्षिक उत्पादन (टन) | क्षेत्र (हेक्टर) | वार्षिक उत्पादन (टन) |
| खरीप हंगाम | २७२.९० | १५३.०७ | ५३०.०० | ३२३.०० |
| रब्बी हंगाम | २६४.५१ | ८६.०२ | ४४७.०० | १५६.०० |
| वनजमिनीवरील उत्पादन | २४८.६७ | ३०३.३८ | २४८.६७ | ३८०.०० |




# बुचकेवाडीतील नावीन्यपूर्ण उपक्रम

पाणलोट क्षेत्रविकास कार्यक्रमाने बुचकेवाडीच्या विकासाची कवाडं उघडली. पण ही तर केवळ सुरुवात होती. गावाच्या सर्वांगीण विकासासाठी आणखी काही पावलं उचलणं आवश्यक होतं. गावातील प्रत्येकाची आत्मनिर्भरता, पशुधनविकास, आर्थिक सक्षमता यासाठी या गावात विविध उपक्रम आखण्यात आले. यातल्या अनेक उपक्रमांना नाबार्डचं अर्थसाहाय्य लाभलं. हे उपक्रम इतर गावांना नक्कीच मार्गदर्शक ठरतील

लुपिन फाउंडेशन

# शेतकरी साहित्य बँक : आधुनिक 'इर्जिक'

**गा**वात ज्याच्याकडे बैल किंवा इतर सामान नसल्याने मोसम जात असताना शेत पडून आहे, त्याच्यासाठी गाव म्हणजे एक कुटुंब, या भावनेने लोक पूर्वी धावून जायचे. कोणी बैल द्यायचा, कोणी नांगर, कोणी दाणे. या प्रथेला 'इर्जिक' म्हटलं जायचं. आज सर्वत्र ही प्रथा उरली असेलच असं नाही.

बुचकेवाडीने 'शेती अवजार बँके'च्या माध्यमातून या प्रथेचं आधुनिक शेतीसाठी पुनरुज्जीवन केलं...

शेतीसाठी लागणारी आधुनिक अवजारं एकेकटा शेतकरी विकत घेऊ शकत नाही. ही समस्या लुपिनने गावकऱ्यांपुढे मांडली. त्यानंतरच्या चर्चेतून 'शेतकरी अवजार बँक' ही कल्पना पुढे आली. स्थानिक शेतीच्या गरजा, आधुनिक अवजारं याबाबत चर्चा होऊन या उपक्रमासाठी किती रक्कम लागेल याचा अंदाज बांधला गेला. गावाचं



बीजभांडवल व नाबार्डकडून अर्थसाहाय्य याआधारे अवजारांची खरेदी करण्यात आली.

गावात नवनवीन अवजारं आली. ती अत्यंत अल्प भाडेतत्त्वावर शेतकऱ्यांना उपलब्ध केली जात आहेत. अवजारांच्या देखभाल-दुरुस्तीचा खर्च शेतकऱ्यांनी भाडे म्हणून जमा केलेल्या रकमेतून निघतो. ■



## महाराष्ट्रात शेतकरी साहित्य बँकेचं हे एकमेव उदाहरण असावं!

''लुपिन फाउंडेशनने आमच्यापुढे प्रस्ताव मांडला, गावातील सर्वांना उपयोगी ठरेल असा कोणता उपक्रम असू शकतो? आम्ही विचार केला, गावात सगळे शेतकरी. पण काही गरीब शेतकऱ्यांना आधुनिक अवजारं परवडत नाहीत. मग सामुदायिक अवजारं का घेऊ नयेत? त्यातून शेतकरी साहित्य बँकेची कल्पना साकारली...''

**-देविदास पवार**

# कांदा-बटाटा चाळ

**बु**चकेवाडीतील शेतकरी दरवर्षी कांदा व बटाटा यांची पिकं काही प्रमाणात घेतात, परंतु खरीपात बटाटा व रब्बीत कांदा उत्पादन एकदम निघत असल्याने बाजारभाव खाली येतात. साठवणुकीची यंत्रणा नसल्याने शेतकऱ्यांना कांदा व बटाटा येईल त्या किमतीस विकण्याशिवाय पर्याय नसे. हे लक्षात घेऊन लुपिन फाउंडेशन व नाबार्डमार्फत शेतकऱ्यांना अर्थसाहाय्य पुरवण्यात आलं. तब्बल २५ ते ५० टन क्षमतेच्या कांदा व बटाटा चाळी शेतकऱ्यांनी उभारल्या. त्यातून जवळपास १५० मे. टन कांदा व बटाटा साठवणुकीची सोय झाली.

कांदा हा नेहमीच महागाईने मध्यमवर्गाच्या डोळ्यांत पाणी आणणारा शेतमाल आहे. त्याचे भाव जसे ग्राहकांच्या चिंतेचे असतात तसेच ते शेतकऱ्यांसाठीही चिंतेचे असतात. कारण बाजारात तेजी असते तेव्हा मुख्यतः साठवण करणाऱ्या व्यापाऱ्यांना त्याचा फायदा होतो. शेतकऱ्यांना त्याचा लाभ घेता येत नाही. शेतकऱ्यांनी कांदा साठवण्यासाठी स्वतःचे चाळ उभारणे हा एक या समस्येवरचा एक उपाय आहे. शासन शेतकऱ्यांना चाळ बांधण्यासाठी एका योजनेद्वारे अर्थ साहाय्यही करतं; पण प्रशासनाच्या गलथान कारभारामुळे ही योजना शेतकऱ्यांना लाभत नाही. मोठे शेतकरी चाळ उभारू शकतात. मध्यम शेतकऱ्यांकडे तेवढी आर्थिक क्षमता नसते. एक साधारण चाळ उभारण्यासाठी दीड लाखापर्यंत खर्च येतो. बुचकेवाडीतील बहुतांश मध्यम शेतकऱ्यांना तो उचलणे शक्य नव्हतं. ही समस्या लक्षात घेऊन लुपिन फाउंडेशनने कर्जपुरवठा करण्याचा निर्णय घेतला. तशी मागणी शेतकऱ्यांनीच केली होती. या घडामोडीमुळे स्थानिक कांदा व बटाटा उत्पादकांमध्ये उत्साह संचारला आहे...

**''यंदा आमच्या शेतातून कांदा काढला तेव्हा त्याला किलोमागे फक्त ५ ते ६ रुपये बाजारभाव होता. तेव्हा मी तो कांदा बाजारात विकला नाही. आता २५ ते ३० रुपये किलो भाव झालाय. आता आम्ही कांदा बाजारात विकणार. चाळ बांधला नसता. तर हा फायदा झाला नसता.''**

**-बबन डेरे**



# ग्राहकांना थेट भाजीपाला विक्री

**शे**तकरी आपल्या शेतातील भाजीपाला मुंबई अथवा तत्सम बाजारपेठांमध्ये पाठवतात. हा भाजीपाला विकताना ग्राहकांना लावली जाणारी किंमत व शेतकऱ्यांना मिळणारा भाव यामध्ये बरंच अंतर असतं हे सर्वश्रुत आहे. या समस्येवर लुपिन फाउंडेशनने मार्ग काढला. पुणे शहरातील काही सोसायट्यांमध्ये बुचकेवाडीतील तरुणांना भाजीविक्री केंद्रासाठी मोफत जागा मिळवून दिली. सोसायटीमधील रहिवाशांना स्वस्त व ताजी भाजी मिळत नसल्याने त्यांनीही या उपक्रमाला संमती दाखवली. दलाली, आडत, वाहतूक यावरचा खर्च वाचत असल्याने शेतकऱ्यांनी या उपक्रमात उत्साहाने सहभाग घेतला.

शेतकरी आडतीवर शेतमाल घेऊन जातात तेव्हा व्यापारी बऱ्याचदा निम्माअधिक माल 'खराब' असल्याची सबब सांगून शेतकऱ्यांना अक्षरशः फसवतात. या समस्येवर मार्ग काढण्यासाठी महाराष्ट्र शासनाचा कृषी विभाग व अखिल भारतीय भाजीपाला उत्पादक संघ यांनी शेतकऱ्यांचा माल शहरातील गृहनिर्माण संस्थांमध्ये थेट विक्रीची संकल्पना मांडली होती. या संकल्पनेवर आधारित महाराष्ट्रात पहिलं भाजीपाला विक्री केंद्र बुचकेवाडीतील शेतकऱ्यांनी पुण्यातील कोथरूड व गुरु गणेशनगर इथे सुरू केलं.



**"लुपिन फाउंडेशनच्या सहकार्याने वारजे येथील नादब्रह्म सोसायटीतील एक हजार फ्लॅट्सना आम्ही यशस्वीरीत्या भाजीविक्री केली आहे."**

**–गोरक्ष बुचके**



# गटशेती



पिढ्यान्‌पिढ्या होत असलेली जमिनीची खातेफोड यामुळे अल्पभूधारक शेतकऱ्यांमध्ये होत असलेली वाढ, तसंच जमिनींची कमी उपलब्धता यामुळे शेती हा व्यवसाय आतबट्ट्याचा झालाय, अशी समस्या शेतकऱ्यांकडून ऐकायला मिळते. बुचकेवाडीमध्ये लुपिन फाउंडेशनच्या साहाय्याने येथील शेतकऱ्यांनी या समस्येवर मात करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठी येथील शेतकऱ्यांनी 'जॉइंट लायबिलिटी ग्रुप' (जेएलजी) निर्माण केले.

'पेप्सी' या वेफर्स उत्पादन करणाऱ्या कंपनीला विशिष्ट बटाटा उत्पादन करून देण्यासाठी बुचकेवाडीमध्ये शेतकऱ्यांनी 'जॉइंट लायबिलिटी ग्रुप' (जेएलजी) तयार केले. २० शेतकऱ्यांचा एक गट अशा दोन गटांनी 'पेप्सी' कंपनीकडून बटाट्याचं वाण ठोक भावात खरेदी केलं. पिकासाठी खतांची खरेदीही ठोक भावानेच करण्यात आली. यामुळे शेतकऱ्यांची खूप बचत झाली. पण हा गटशेतीचा उद्योग करण्यासाठी खरी मदत झाली लुपिनमार्फत मिळणाऱ्या अर्थसाहाय्याची.

अल्पभूधारक, मध्यम शेतकऱ्यांची बाजारात पत नसते. बँका कर्ज देताना सात-बारावर कर्जाच्या नोंदी करतात. शिवाय कर्ज मिळवण्यासाठी शेतीची कामं मागे टाकून बँकेत अनेक हेलपाटे घालावे लागतात. यामुळे बँकांऐवजी शेतकरी खासगी सावकारांना फशी पडतात.

बुचकेवाडीमध्ये 'जॉइंट लायबिलिटी ग्रुप'च्या प्रयोगातून लुपिनने शेतकऱ्यांची एकप्रकारे पत वाढवली. या प्रयोगाकडे नारायणगावच्या स्टेट बँक ऑफ इंडियाचं लक्ष वेधलं गेलं. विशेष म्हणजे दुसऱ्या वर्षी हा प्रयोग राबवण्यासाठी या बँकेने शेतकऱ्यांना कर्जपुरवठा केला. इतकंच नाही, तर शेतकऱ्यांचा वेळ बहुमोल म्हणून बँकेचे प्रतिनिधी गावात आले. गावात बसूनच त्यांनी कर्ज प्रकरणांसाठीच्या कागदपत्रांची व इतर प्रक्रियेची पूर्तता केली. शेतकऱ्यांनी अशा प्रकारे बाजारात आपली 'पत' निर्माण केल्याचं हे एक विरळा उदाहरण असेल.

---

**"मी पूर्वी मुंबईत टॅक्सी चालवायचो. तिकडे भागत नव्हतं. इथे वडिलोपार्जित थोडीशी शेती होती म्हणून सगळं कुटुंब घेऊन गावात आलो. वर्षभर दुसऱ्याच्या घरात भाड्याने राहिलो. कारण जुनं घर मोडकळीस आलेलं. शेती करायला लागलो. लुपिन फाउंडेशनने येथील शेतकऱ्यांचे जॉइंट लायबिलिटी ग्रुप केले. मी त्यात भाग घेतला. या गटाला बटाट्याच्या पिकासाठी कर्जरूपात अर्थसाहाय्यही मिळालं. पहिल्याच वर्षी ३५ ते ४० हजारांचा फायदा झाला. आता मी गावातच चांगला स्थिरस्थावर झालोय."**



**सुनील पवार**



# वनसंवर्धन/दुग्धव्यवसायाला प्रोत्साहन

**पा**णलोट क्षेत्रविकास कार्यक्रम राबवताना गावालगतचा परिसर व जंगलात वृक्ष लागवडीसाठी नर्सरीची गरज होती. ही जबाबदारी गावातील दोन तरुणांनी घेतली. काशीद, बांबू, सीताफळ, शेवगा अशी जवळपास ४५,००० रोपं या तरुणांनी नर्सरीमध्ये तयार केली. या रोपांच्या लागवडीसाठी गावाने सामूहिक अभियान हाती घेतलं. गावात वृक्षदिंडीसारखे उपक्रम आखले. दरवर्षी जंगलात झाडांची लागवड केली. गावालगतच्या जंगलाची जबाबदारीच गावाने संयुक्त वन समितीच्या पुढाकारातून स्वीकारली.

गावातील अतिरिक्त भाकड जनावरं ही एक प्रकारे जंगलावर ताणच असतात. ही जनावरं मोकाट चरत जंगलाचं नुकसान करतात. त्यामुळे गावाने चराईबंदी केली. हळूहळू भाकड जनावरांचं प्रमाणही कमी केलं. शेतकऱ्यांनी संकरित दुभती जनावरं घ्यावीत यासाठी लुपिन फाउंडेशनने शेतकऱ्यांना कर्जपुरवठा केला. शेतकऱ्यांनी जंगलातील चारा कापून मगच तो जनावरांना द्यायचा असा नियम केला. त्यामुळे एकीकडे जंगलाची नासधूस वाचली नि दुसरीकडे दुग्धव्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी उत्तम चारा पुरेशा प्रमाणात मिळू लागला.

बुचकेवाडीभोवतालच्या २४८ हेक्टर वनक्षेत्रात गावकऱ्यांनी जवळपास ७०,००० झाडं लावली आहेत. ■

---

''माझं शिक्षण दहावीपर्यंतच झालं. दहावीनंतर मी शेतीतच लक्ष घातलं; पण जोडधंद्याशिवाय नुसत्या शेतीवर भागणं अवघड होतं. आम्ही दुधव्यवसाय करायचो. रोज १०-१५ लिटर दूध विकायचो. लुपिन फाउंडेशनने गाईसाठी कर्ज दिलं. त्यामुळे आता रोज २५-३० लिटर दूध डेअरीला जातंय.''

**-संचित पवार**




## वनसंरक्षणासाठी वैशिष्ट्यपूर्ण योजना

*गावाने जंगलात गुरांना चराईबंदी केली. तरीही कोणी मोकाट जनावरं जंगलात सोडलीच, तर त्यांना अडवण्यासाठी गावातील एका तरुणाची वनसंरक्षक म्हणून निवड करण्यात आली. गुरं मोकाट सोडणाऱ्यांवर दंड बसवण्यात आला. वनसंरक्षक तरुणाने अशी मोकाट गुरं सोडणाऱ्यांवर नजर ठेवायची व त्यांना दंड म्हणून केलेली रक्कमही मिळवायची, अशी ही वैशिष्ट्यपूर्ण योजना वनसंवर्धनासाठी खूप मोलाची ठरली.*

# फळ लागवड

**गा**वाने वणव्यापासूनही जंगलाचं संरक्षण करण्याची जबाबदारी घेतली. वनसंवर्धन व कृषिविकासाचं पुढचं पाऊल बुचकेवाडीने लुपिन फाउंडेशनच्या सहकार्याने उचललं. गावातील तरुणांनी स्वयंरोजगार म्हणून सुरू केलेल्या नर्सरीतील फळझाडांची रोपं शेतकऱ्यांनी घेतली. शिवाय लुपिनकडून शेतकऱ्यांना कोकणातील केशर आंब्याची उत्तम गुणवत्तेची रोपं उपलब्ध करून देण्यात आली. या फळशेतीला ड्रिप इरिगेशनची जोड दिली गेली. बुचकेवाडीतील शेतकरी पूर्वी वर्षातले दोन महिने मुंबईला फळांच्या आडतीवर काम करायचे, पण त्यांची स्वतःची फळबाग मात्र नव्हती. आता बुचकेवाडीलगत अनेक शेतकरी फळ बागायतदार झाले आहेत.

२०१४ पर्यंत बुचकेवाडी भोवतालच्या परिसरात १०१ एकरांवर आंबा व डाळिंबाची लागवड झाली असून, ५८ एकरांवर सीताफळ, बोर, चिंच आणि आवळा या फळांची लागवड झाली आहे.



''माझी एक एकर जमीन आहे. त्यात मी भाजीपाल्याची लागवड करायचो. लुपिन फाउंडेशनने फळ लागवडीसाठी प्रोत्साहन दिलं. आंबा, सीताफळ, कंठी आवळा यांची रोपं शेतकऱ्यांना दिली. सीताफळाला खर्च कमी, त्यामुळे मी सीताफळाची लागवड केली. आंतरपीक म्हणून टोमॅटो लागवड केली. सीताफळाचं वाणही वेगळं आहे. झाडाला मोठी फळं येतील, त्यामुळे दुहेरी नफ्याची आशा आहे.''

– हौशीराम डेरे



## फळ लागवड : स्वयंसेवी संस्थेची भूमिका पूल सांधण्याची...

*शेतकरी वर्षानुवर्षं पारंपरिक शेती करत आलेत. वर्षानुवर्षं-हंगामानुसार ठरलेल्या चाकोरीत शेती करत आहेत. या चाकोरीमध्ये बदल करावा, थोडं धाडसाने वेगळं काही करावं यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहनच मिळत नाही. लुपिन फाउंडेशनने शेतकऱ्यांमध्ये उत्साह भरण्याचं काम बुचकेवाडीमध्ये केलं. प्रत्येक शेतकऱ्याच्या शेतात जाऊन, त्याच्या शेताची शास्त्रशुद्ध चाचणी करून त्या जमिनीत काय घडू शकतं याबद्दलची माहिती दिली. प्रगत लागवडीला प्रोत्साहन दिलं. उत्तम रोपं उपलब्ध करून दिली. शेतकरी आणि प्रगत तंत्रज्ञान यांच्यातील दरी मिटवण्याची भूमिका लुपिन फाउंडेशनने निभावली आणि शेतकरी नवी वाट चालू लागले...*



# सुधारित भात वाणाची लागवड नि आधुनिक शेती

**भा**रत हा जगातील दुसऱ्या क्रमाकांचं भात उत्पादक राष्ट्र आहे. भारतातील खूप मोठ्या लोकसंख्येची दारोमदार भात या पिकावरच असते. बहुतांश आदिवासी लोकसमुहांचं पिक व खाद्य भातच आहे. पण हे समुह अजूनही जुन्याच पद्धतीने शेती व जुन्या वाणांचीच लागवड करताना आढळतात. भारतातील वाढत्या लोकसंख्येची अन्नाची गरज लक्षात घेता देशभरात सुधारित-संकरित वाणांची लागवड होऊ लागली. परिणामी आपलं सकल उत्पादनही वाढलं आहे. पण नवं ज्ञान अगदी अलीकडेपर्यंत बुचकेवाडीसारख्या छोट्या गावांमध्ये पोहोचलेलं नव्हतं. लुपिन फाऊंडेशनने येथील शेतकऱ्यांना भाताच्या संकरित जाती व लागवडीच्या पद्धतींची ओळख घडवली. परिणामी येथील शेतकऱ्यांनी भातलागवड व उत्पादनामध्ये अमुलाग्र बदल घडवून दाखवला आहे.

खत घालताना पुर्वी इथले शेतकरी युरिया पिकावर फेकायचे. फेकलेल्या खतातील निम्मे युरिया पाण्यातून वाहून जायचे. लुपिन फाऊंडेशनने येथील शेतकऱ्यांना 'युरिया ब्रिकेट' या खत घालण्याच्या नव्या पद्धतीची ओळख करून दिली. त्यामुळे खतावरील खर्चात ५० टक्के बचत होऊ लागली.

पिकलागवडीमध्येही आता इथले शेतकरी चारसुत्री पद्धतीचा अवलंब करत आहेत. या पद्धतीमुळे उत्पादनात भरघोस वाढ झाल्याचं आढळत आहे.

**"पूर्वी आम्ही पारंपारिक खडक्या आंबेमोहर, इंद्रायणी इत्यादी भाताच्या वाणांची लागवड करायचो. फक्त भुईमुग नि तांदुळ ही दोनच रोखीची पिकं घ्यायचो. पण आलेलं पिक बरचसं वर्षभर घरातच खायला खर्ची पडायचं. पण आता आम्ही फुले समृद्धी, सह्याद्री, पार्वती, मंगला इत्यादी संकरित व सुधारित वाणांची लागवड सुरू केलीय. त्यामुळं शेतकऱ्यांच्या उत्पन्नात चांगलीच वाढ झालीय."**

**- ज्ञानेश्वर पवार**



# आधुनिक शेतीसाठी : ठिबक सिंचन प्रयोग



**भा**रतात, विशेषतः महाराष्ट्रात सूर्यप्रकाश, हवा व सर्वसाधारण जमीन भरपूर आहे. पण पाण्याच्या कमतरतेमुळे अनुकुल नैसर्गिक संसाधनांचा वापर आपल्याला करून घेता आलेला नाही. म्हणून शेतीचा खऱ्या अर्थाने विकास करायचा असेल तर पाणी हा महत्त्वाचा घटक मानून त्याच्या नियोजनावर लक्ष केंद्रीत व्हायला हवे. पाण्याच्या नियोजनाची नि उत्पादनवाढीची गुरूकिल्ली म्हणून ठिबक सिंचनाकडे बघितलं जातं.



''पूर्वी पाण्याचं एवढं महत्त्व वाटत नव्हतं. पाटाचं पाणी देऊन मी आंब्याची बाग करत होतो. पण आता पावसाचं प्रमाण कमी होतंय. लुपिन फाऊंडेशनमुळं ठिबक सिंचनाची माहिती समजली. लुपिनमार्फत पाईपलाईसाठी कर्जही मिळालं. मग मी आंब्यात तंबाट्याचं आंतरपिक घेतलं. पहिल्याच हंगामात कर्ज फेडलं. आता ही ड्रीप म्हणजे माझी एक प्रॉपर्टीच आहे...''

**– शांताराम गायकवाड**

## शेतकरी आधुनिक झाले तर बँकाही देतात साथ...

*ठिबक सिंचन पद्धतीने आधुनिक शेतीसाठी पहिल्या टप्प्यात बुचकेवाडीतील तीस शेतकऱ्यांनी पुढाकार घेतला. या शेतकऱ्यांच्या एकुण ६२ एकर जमिनीवर ठिबक सिंचन करायचे असल्यास ३० लाख रूपयांची गरज होती. ही कर्ज रूपाने उभी करण्याचे ठरले. विविध बँकांना प्रस्ताव पाठवण्यात आले. नारायणगावमधील कॅनरा बँकेने किफायतशीर व्याजदरावर कर्ज देण्याची तयारी दाखवली. फळबागा, तरकारी अशा पिकांसाठी शेतकऱ्यांना मग अधिकच हुरूप आला...आगामी काळात बुचकेवाडीभोवती ठिबक सिंचन क्षेत्र वाढतच जाईल असा एकुण माहोल आहे.*

*ठिबकमुळे पिकांची वाढ जोरदार व सारखी होत असल्याने भाजी उत्पादनांवर एक प्रकारची कांती येते त्यामुळे ती जास्त टवटवीत दिसतात. तसेच जमीन ओढणे, खोदणे, वाफे बांधणे-तोडणे इत्यादींवर होणारा अनाठायी खर्च वाचतो. खते व औषधी ही केवळ पिकांसाठी वापरली जात असल्याने तणवाढ कमी होते. त्यामुळे एकुणच खर्चात मोठी घट येते. ठिबक सिंचनाचे हे फायदे लुपिन फाऊंडेशनने बुचकेवाडीतील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवले. त्यामुळे २०१४ पर्यंत बुचकेवाडीतील ४१ शेतकऱ्यांच्या ५३ एकर जमिनीवर ठिबक सिंचन पद्धतीने शेती केली जात आहे.*

# शेतकऱ्यांना अर्थसाहाय्य

**लु**पिन फाउंडेशनमार्फत पाणलोट क्षेत्रविकास प्रकल्पासोबतच यू.पी.एन.आर.एम. हा प्रकल्प नाबार्डच्या अर्थसाहाय्यातून राबवण्यात आला. गावाचा सर्वांगीण विकास व त्यासाठी शेतकऱ्यांना वैयक्तिक पातळीवरही कर्जपुरवठा, असं या उपक्रमाचं स्वरूप राहिलं. हा उपक्रम गावाच्या विकासात कसा सहायक ठरला याचं उदाहरण नामदेव बुचके यांच्या उदाहरणावरून समजेल...

नामदेव हे ५८ वर्षीय गृहस्थ आठ माणसांचं घर शेतीवरच चालवत होते. शेतीच्या उत्पन्नावर भागत नसल्याने त्यांचा थोरला मुलगा शहरात नोकरीसाठी राहत होता. जमीन पाच एकर. शेतात विहीर होती पण ती ढासळली होती. मूळच्या ३० फूट खोल विहिरीत १४ फूट गाळ साचला होता. पावसाच्या पाण्यावर खरिपाचं पीक निघायचं नि रब्बीमध्ये विहिरीच्या पाण्यावर जेमतेम अर्धा एकर जमिनीत गहू घेणं शक्य होई. वर्षाला जेमतेम ३०,००० रुपये उत्पन्न व्हायचं.

यू.पी.एन.आर.एम. कार्यक्रमाबद्दल माहिती मिळाल्यावर नामदेवरावांनी लुपिनच्या कार्यकर्त्यांना आपली समस्या सांगितली. कार्यकर्त्यांनी जमीन व विहीर पाहिली, गरज ओळखली नि ४३,००० रु. कर्ज मंजूर केलं. मग विहिरीतला गाळ काढून तो शेतजमिनीत टाकला गेला. शिवाय आणखी आठ फूट खोदकाम करण्यात आलं. विहिरीतील पाण्याची क्षमता वाढली. नामदेवरावांचं उत्पन्न २०१०-११ च्या खरीप व रब्बी हंगामात वाढलं ते खालील तक्त्यात दर्शवलं आहे.

सर्वांत महत्त्वाचं म्हणजे शेतीत वाढलेल्या उत्पन्नामुळे नामदेवरावांचा थोरला मुलगा शहर सोडून आता पुन्हा गावी येऊन शेतातच फळबागांमध्ये लक्ष घालत आहे.



**"आमच्या विहिरीला पाणी कमी होतं. विहिरीतला गाळ काढायचा, डागडुजी करायची तर सावकाराकडून कर्ज घेण्याशिवाय दुसरा पर्याय नव्हता. लुपिनकडून कर्ज मिळालं. मग विहिरीचं काम करून घेतलं. कांदा लावला. त्याच वर्षी आंब्याची बाग लावली. कांद्यातून सव्वा लाखाचा फायदा मिळाला. लगेच कर्ज फेडलं. आता पुढच्या वर्षी आंब्यालाही फळ धरणार. पूर्वी एकच खरिपाचं पीक घेत होतो. आता वर्षातले दहा महिने उत्पन्न घेतोय."**

**– गोरक्ष बुचके**

खरीप हंगामातील उत्पन्न

| घेतलेलं पीक | क्षेत्र (एकर) | उत्पन्न (रुपये) | उत्पादनखर्च रुपये | निव्वळ नफा |
|---|---|---|---|---|
| भात | ०.२० | २१,००० | ७,००० | १४,००० |
| टोमॅटो | १.२० | १,५०,००० | ६१,००० | ८९,००० |
| बटाटा | २.२० | ९५,००० | ७०,००० | २५,००० |
| भुईमूग | ०.२० | १८,००० | ५,००० | १३,००० |
| एकूण | ५.०० | २,८४,००० | १,४३,००० | १,४१,००० |

रब्बी हंगामातील उत्पन्न

| घेतलेलं पीक | क्षेत्र (एकर) | उत्पन्न (रुपये) | उत्पादनखर्च रुपये | निव्वळ नफा |
|---|---|---|---|---|
| लसूण | ०.२० | ४०,००० | १५,००० | २५,००० |
| हरभरा | ०.२० | ७,००० | १,००० | ६,००० |
| ज्वारी | १.०० | ५,००० | ५०० | ४,५०० |
| गहू | ०.२० | ८,००० | १,००० | ७,००० |
| एकूण | २.२० | ६०,००० | १७,५०० | ४२,५०० |

# गावातील गरीब घटकांसाठी उपजीविका विकास

**गा**वातील सर्वांना विकासाची, उपजिविकेची संधी मिळायला हवी असं लुपिन फाउंडेशन मानते. त्यामुळे गावातल्या अत्यंत गरीब घटकांसाठी वेगवेगळे व्यवसाय सुरू करण्यासाठी पुढाकार घेतला गेला. गावातील ज्या कुटुंबामध्ये मुख्य कर्ता व्यक्ती नाही, ज्यांच्याकडे उत्पनांचं स्थायी साधन नाही, जे भूमिहीन, किंवा निराधारही आहेत वा विधवा आहेत अशा व्यक्तींची यादी करण्यात आली. अशा व्यक्तींकडे कोणतं कौशल्य व ज्ञान आहे याची महिला तसेच गावबैठकांमध्ये चर्चा घडवण्यात आली. गावकऱ्यांनी सुचवल्याप्रमाणे मग अशा व्यक्तींना लुपिन फाउंडेशनने नाबार्ड द्वारा अर्थसाहाय्य केलं.

सुतार व्यवसाय, चर्म व्यवसाय, शिलाई मशिन, बांगडी व्यवसाय, पीठ गिरणी, मोटर रिवाइंडिंग, व्हेइकल रिपेरिंग शॉप, स्क्रीन प्रिंटिंग, डाळ मिल, समारंभांसाठी लागणारी भांडी पुरवण्याचा व्यवसाय, अशा विविध व्यवसायांसाठी अर्थसाहाय्य करण्यात आलं. गावातील एकूण ३६ व्यक्तींना या माध्यमातून नव्या रोजगार संधी मिळाल्या आहेत.



**विमल पवार**

**‘‘आमची जमीन फक्त वीस गुंठे. तीसुद्धा खडकाळ. खरिपात भात नि भुईमूग पिकतो, पण त्यावर भागत नाही. म्हणून मी शिलाई मशिनवर काम करते. पण माझं मशिन जुनं. त्यावर कशीबशी मी थोडंबहुत कुटुंबाला हातभार लावत होते. बचत गटाच्या बैठकीत लुपिन फाउंडेशनकडून नव्या मशिनच्या खरेदीला मदत मिळू शकते असं समजलं, पण त्यासाठी मीसुद्धा थोडे पैसे जमवले पाहिजेत असं कळलं. मग मी सोळाशे रुपये जमवले. लुपिन फाउंडेशनमुळं नवीन मशिन मिळालं. आता काम फास्ट झालं. उत्पन्न दुप्पट झालं.’’**





# महिलाविकास

**गा**वातील महिला गावाच्या विकासात अग्रभागी असाव्यात यासाठी लुपिन फाउंडेशनने गावामध्ये वेळोवेळी महिला मेळावे, महिलांच्या अभ्यास सहली आयोजित केल्या. परिणामी, या गावातील महिला आता गावाच्या निर्णय प्रक्रियेतही पुढाकार घेत आहेत.

बुचकेवाडीमध्ये महिला विकासासाठी वैशिष्ट्यपूर्ण धोरण लुपिन फाउंडेशनच्या मार्गदर्शनाखाली आखण्यात आलं आहे. या गावामध्ये पूर्वी फक्त एखाद-दुसरा बचतगट होता. लुपिन फाउंडेशनने गावात विकासप्रकल्प राबवायला सुरुवात केल्यानंतर १३ बचत गट झाले. या गटांच्या माध्यमातून गावातील १५७ महिला गावाच्या विकासप्रक्रियेत सहभागी झाल्या आहेत. गावातील सर्व बचत गटांची एक संयुक्त समिती लुपिन फाउंडेशनच्या पुढाकाराने निर्माण करण्यात आली. या संयुक्त समितीचं नामकरण झालं – गायत्री संयुक्त महिला समिती. प्रत्येक बचत गटाची एक प्रतिनिधी या समितीमध्ये निवडण्यात आली. गावामधील महिलांच्या आकांक्षा, विकासाची गरज याबाबत गायत्री संयुक्त महिला समितीमध्ये विचारविनिमय होऊ लागला. बचत गटांचे हिशोब कसे ठेवायचे, कर्जवसुलीच्या नोंदी, बँकेशी निगडित व्यवहार याबाबतचं रीतसर प्रशिक्षण लुपिन फाउंडेशनने महिलांना दिलं.

गायत्री संयुक्त महिला समितीने गावातील महिलांची घरगुती व्यवसाय करण्याची इच्छा हेरली. लुपिन फाउंडेशनने या महिलांना कर्जपुरवठा केला. त्यातून गावातील महिलांनी गारमेंट व्यवसाय, बारदान विक्री व्यवसाय तसेच सुंठवडा व्यवसाय, हातसडीच्या तांदळाची विक्री, मिरची कांडप असे विविध उद्योग सुरू केले आहेत. या व्यवसायांसाठी प्रशिक्षणाची सुविधा लुपिनने उपलब्ध केली.

‘‘लुपिन फाउंडेशनने आमची भीमथडी जत्रेत सहल नेली. तिथे आम्ही महिला आपल्या वस्तूचं मार्केटिंग कसं करतात याची निरीक्षणं केली. मग आपणही काही तरी करून दाखवू, असं आम्ही ठरवलं. मग भीमथडी जत्रेत आम्ही चौघींनी मिळून मासवडी जेवण व कडधान्याचा स्टॉल लावला. फक्त चार दिवसांत आम्ही ३८,००० रुपयांचा नफा मिळवला.’’

**–कालिंदा पवार**

*बुचकेवाडी व लगतच्या परिसरात टोमॅटो, बटाटा ही पिकं घेणारे बरेच शेतकरी आहेत. ही पिकं बाजारात जाताना त्यांच्या पॅकिंगसाठी नायलॉनच्या वैशिष्ट्यपूर्ण पिशव्यांचा वापर केला जातो. या पिशव्या व्यापाऱ्यांकडून घेण्यापेक्षा त्यांचं उत्पादन शिवाई गावातील महिला करू लागल्या आहेत. या पिशव्यांच्या निर्मितीसाठी एक मशिन गावामध्ये लुपिन फाउंडेशनच्या सहकार्याने बसवण्यात आलं आहे. लघुउद्योगाचा हा एक वैशिष्ट्यपूर्ण नमुना आहे.*

# संगणकीकृत पाणी मोजमाप यंत्र

उपलब्ध पाण्याचं सोशल ऑडिट व्हावं, पाण्याचा वापर करणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये अधिक जबाबदारीने पाणीवाटप व्हावं यासाठी बुचकेवाडीने नजीकच्या बंधाऱ्यातील पाणीवापराचं मोजमाप करणारं जी.आय.एस. हे यंत्र बंधाऱ्याजवळ बसवलं आहे. बुचकेवाडीनजीकच्या पाझर तलावाचं पाणी घेणाऱ्या आठ पाणीवापर सोसायट्या आहेत. या सोसायट्यांमध्ये प्रत्येकी पाच-सहा शेतकऱ्यांमध्ये मिळून एक पंप पाणी खेचतो. कोणत्या पंपाने किती पाणी खेचलं याची नोंद जी.आय.एस. प्रणालीतून संगणकात होते. या पद्धतीचा सर्वांत उत्तम फायदा म्हणजे उपलब्ध पाण्याचं चोख नियोजन शक्य होतं. जी.आय.एस. ही इस्रायलमध्ये विकसित झालेली प्रणाली आहे. संपूर्ण आशियात या प्रणालीचा प्रथमच वापर बुचकेवाडीमध्ये केला जात आहे.

जी.आय.एस. प्रणालीच्या माध्यमातून तलावामध्ये दरवर्षी होणारा पाणीसाठा, त्याआधारे प्रत्येक पाणीवापर सोसायटीला किती पाणी वापरता येईल, शिवाय कोणतं पीक घेतल्यास उपलब्ध पाणीसाठ्याचा प्रभावी उपयोग करून घेता येईल याचा निर्णय शेतकरी सामूहिक विचारविनिमयातून करू शकणार आहेत. जी.आय.एस. प्रणाली बसवणारं बुचकेवाडी हे देशातील पहिलंच गाव असावं.





# सेंद्रिय शेतीसोबत अपारंपरिक ऊर्जेला प्रोत्साहन

जनावरांच्या शेणाचा उपयोग ऊर्जेसाठी व खतासाठी करण्यातही गावकऱ्यांनी पुढाकार घेतला आहे. गावात २०१४ पर्यंत २० कुटुंबांनी गोबर गॅस तर २८ कुटुंबांनी गांडूळखत युनिट बसवले आहेत. त्यामुळे सेंद्रिय शेतीचेही प्रयोग आता शेतकरी करू लागले आहेत.

रासायनिक खतांच्या वापराची सवय झाल्याने सुरुवातीला गांडूळखताचे युनिट उभारण्यास शेतकरी तयार होत नव्हते. त्यामुळे मग गावातील वेगवेगळ्या भागांत आठ गांडूळखत युनिट उभारण्यात आले. या आठही शेतकऱ्यांच्या उत्पन्नात भरघोस वाढ झाली. ते पाहून मग हळूहळू गांडूळखताचं पेव गावामध्ये मूळ धरू लागलं. २०१४ पर्यंत २८ शेतकऱ्यांनी गांडूळखताचे युनिट उभारले आहेत. एका शेतकऱ्याकडे तर गुरंही नाहीत, तरीही गावातील इतरांकडून अथवा रस्त्यावरून पडलेलं शेण गोळा करून त्यावर तो गांडूळखत निर्मिती करत आहे.

**गा**वाचा सर्वांगीण विकास घडवण्यासाठी बुचकेवाडीतील प्रत्येकजण आपापल्या परीने झटत आहे. गावाच्या स्वच्छतेसाठी सर्व गावकरी सामूहिक स्वच्छता अभियान राबवतात.



"आम्ही पूर्वी रासायनिक शेती करायचो. खतांसाठी वर्षाला अंदाजे २० ते २५ हजार रुपये खर्च व्हायचे. तीन वर्षांपासून लुपिन फाउंडेशनमुळे आम्ही गांडूळखत प्लांट उभारला. या खतामुळे आता उत्पादन तर वाढलंच, पण खतावरील खर्चही वाचला."

**–गोरक्ष बुचके**



"लुपिन फाउंडेशनने मालवण, कुडाळ, बाएफ संस्था यांच्याकडे आमच्या सहली नेल्या. तिथे आम्ही गोबर गॅस प्लांट पाहिले. मग आम्हीही गोबर गॅस प्लांट उभारला."

**–सविता पवार**

*जंगलातील लाकुडतोडीला लगाम बसावा यासाठी बुचकेवाडीमध्ये शेतकऱ्यांना बायोगॅस वापरण्यास प्रोत्साहन दिलं जात आहे. २०१४ पर्यंत गावातील वीस कुटुंबांनी दोन घनमीटर क्षमतेचे गोबर गॅस प्लांट तयार केले आहेत.*

# पाझर तलावातील गाळाचा उपसा

१९७६ साली बांधलेल्या बुचकेवाडीनजीकच्या पाझर तलावातील गाळाचा उपसा कित्येक दिवस झाला नव्हता. त्यामुळे तलावाची पाणी साठवणक्षमता कमी झाली होती. शिवाय तलावाखालील पाण्याचे नैसर्गिक झरेही बुजले होते. बुचकेवाडीने तलावातील गाळ काढण्याचा निर्णय घेतला. यासाठी जे.सी.बी. मशिनसाठी लुपिन फाउंडेशनने सहकार्य दिलं, तर गावकऱ्यांनी श्रमदानातून या कामात सहभाग नोंदवला. तलावातून निघालेला गाळ पंधरा शेतकऱ्यांनी आपल्या पडीक जमिनीवर टाकला. त्यामुळे या शेतकऱ्यांच्या जमिनींचा पोत वाढण्यास मदत झाली.

या उपक्रमामुळे गावाभोवतालची दहा एकर हलकी जमीन शेतीयोग्य व पाच एकर पडीक जमीन लागवडयोग्य झाली, तसेच सिंचनाखालील क्षेत्र वाढण्यासही मदत झाली.



# शिवकालीन टाक्यांची निर्मिती

**गा**वाभोवतालच्या खडकाळ जमिनीत टाकी खोदण्याची एक योजना राज्य शासनामार्फत राबवली जाते. पाण्याची टंचाई होईल तेव्हाच्या काळात राखीव पाण्याचा साठा उपलब्ध असावा यासाठी ही योजना राबवली जाते. शिवाजी महाराजांच्या काळात किल्ल्यांवर खडकाळ टाकी बांधली जायची. त्यातलं पाणी वर्षभर पुरायचं. हीच संकल्पना 'शिवकालीन टाकी' या योजनेमार्फत राबवली जाते. बुचकेवाडीने ही योजना राबवण्यात पुढाकार घेतला. गावासभोवतालचा परिसर व वाड्यांसाठी मिळून नऊ टाक्यांची निर्मिती करण्यात आली आहे.

बुचकेवाडीची खेतेपठार ही डोंगरावरची आदिवासी वाडी आहे. या वाडीवरील लोकांना गावात यायचं झाल्यास खूप उंच चढण उतरत यावं लागतं. उन्हाळ्यात या वाडीवर पूर्वी पाणीच नसायचं. त्यामुळे वाडीवरील महिला दिवसभर डोंगर चढत-उतरत पाण्याच्या खेपा करायच्या. पण आता या खेतेपठारावर शिवकालीन टाकीची निर्मिती झाल्यापासून वाडीला वर्षभर पाण्याची सोय झाली आहे. ■

**''गेली दोन वर्षं आजूबाजूच्या गावांना दुष्काळाचा फटका बसला, पण आम्हाला तो प्रश्न जाणवला नाही. शिवकालीन टाक्यांमुळे आम्हाला वर्षभर पाण्याची सोय झालीय. पूर्वी होळीच्या वेळी आम्हाला वाडीवरून खाली गावात उतरून पाणी भरावं लागायचं. आठ दिवसांतून एकदाच अंघोळ करता यायची. जनावरांसाठी पाण्याचाही खूप त्रास होता. आता ते दिवस सरले.''**


**-मारुती धनफुटे**



# पाणंद रस्तानिर्मिती

**शा**सनाची पाणंद रस्ताबांधणीची एक योजना आहे. जुन्नर व आंबेगाव तालुक्यात भाजीपाला पिकांचं क्षेत्र वाढावं हा या योजनेचा उद्देश आहे. अनेक शेतकऱ्यांच्या जमिनींपर्यंत वाहन पोहोचत नसल्याने शेतकरी भाजीपाल्याचं उत्पादन घेत नाहीत. अशा शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत वाहन पोहोचण्यापुरता रस्ता झाला तर आपोआपच भाजीपाल्याचं लागवडक्षेत्र वाढेल. म्हणून रस्तेबांधणीसाठी संसाधनांची सुविधा प्रशासनाकडून पुरवली जाते. पण या योजनेला बहुतेक गावांमधून प्रतिसाद मिळत नाही. कारण रस्त्यासाठी लागणारी जमीन द्यायला शेतकरी तयार होत नाहीत. शेतकऱ्यांमध्ये बांधावरूनच अनेक वाद आढळतात, तिथे रस्त्यासाठी जमीन कोण देणार?

बुचकेवाडीमध्ये मात्र सर्वानुमते ही योजना राबवण्याचं ठरलं. सामोपचाराने शेतकऱ्यांच्या जमिनीचं अधिग्रहण करण्यात आलं. प्रत्येक सर्व्हे नंबरचा साकल्याने विचार करून प्रत्येक शेतकऱ्याच्या जमिनीपर्यंत रस्ता जाईल असं नियोजन करण्यात आलं. या माध्यमातून बुचकेवाडीलगतच्या जमिनीत १९ कि. मी.च्या पाणंद रस्त्याची निर्मिती झाली आहे. ‘सर्वांचा सर्वांगीण विकास’ हे धोरण या गावाने स्वीकारल्यामुळेच हे शक्य झालं आहे. ■





# गुरुवर्य कोंडाजीबाबा डेरे ट्रस्ट : वैष्णवधामचा पाया

बुचकेवाडीचं रूपांतर वैष्णवधाममध्ये होण्यात या गावाने चालवलेली एका अनोख्या संस्थेची भूमिका महत्त्वाची आहे. कोंडाजीबाबा डेरे हे एक सत्पुरुष या गावामध्ये होऊन गेले. पंचक्रोशीतील अनेक गावांमध्ये या सत्पुरुषाला लोक कीर्तनासाठी बोलवत, त्यांचं मार्गदर्शन घेत. कार्तिक महिन्यात या गावातून पंढरपूरला दिंडी जाते. या दिंडीची परंपरा डेरे महाराजांनी सुरू केली. परिसरातील अनेक वारकरी या दिंडीला जोडले गेले. त्यामुळे जणू येथील शेतकऱ्यांसाठी बुचकेवाडी म्हणजे एक आध्यात्मिक केंद्रच बनलं. डेरे महाराजांच्या निधनानंतरही गावाने आपला हा लौकिक तसाच जपला. किंबहुना त्यापुढचं पाऊल टाकत गावाने 'कोंडाजी बाबा डेरे ट्रस्ट'ची स्थापना केली. या ट्रस्टमार्फत हरिभक्त परायणचं शिक्षण देणारी संस्था गावाने सुरू केली. या संस्थेची एक इमारतही गावाने सामूहिक निधीतून उभी केली आहे.

या संस्थेत राहून शिकणारी मुलं आसपासच्या गावांमध्ये कीर्तनांसाठी जातात. कीर्तनकाराला मिळालेलं मानधन संस्थेच्या कार्यासाठी उपयोगात आणलं जातं. याशिवाय दिंडीच्या दरम्यानही गावोगावचे लोक या संस्थेसाठी रोख रक्कम, धान्य आदी वस्तूंची देणगी देतात. समाजबळावर गावाने एखादी संस्था चालवणे याचं महत्त्व इथे अधोरेखित करायला हवं.

कोंडाजीबाबा डेरे ट्रस्टच्या कार्याचं महत्त्व व गावकऱ्यांनी सामूहिकपणे असा उत्तम उपक्रम चालवण्याच्या कृतीला सलाम म्हणून लुपिन फाउंडेशनने संस्थेच्या वसतिगृहासाठी सोलर वॉटर हीटर, विद्यार्थ्यांसाठी खाटा, कपाटं असं सहकार्य केलं आहे.

ट्रस्टमार्फत इथे निवासी शिक्षणासाठी येणाऱ्या मुलांकडून अगदी अल्प शुक्ल घेतलं जातं. संस्थेत राहणारी मुलं दिवसभर शाळेत औपचारिक शिक्षण घेतात. शाळेतून आल्यानंतर गीतापठण, कीर्तन करणे, मृदंग-पेटी वाजवणे याचं शिक्षण घेतात. इयत्ता दहावीपर्यंतचं शिक्षण मुलं या संस्थेत राहून घेऊ शकतात. काही मुलं अनाथ असतात. काही पालकांना आपल्या मुलावर भागवत धर्माचे संस्कार व्हावेत असं वाटत असतं. अशी मुलं या संस्थेत दाखल होतात. गावाने स्वबळावर ही संस्था चालवली आहे. आध्यात्मिक शिक्षण, चांगले संस्कार व समाजप्रबोधनासाठी नवी पिढी घडवण्याची जबाबदारी घेणारं बुचकेवाडी हे एक अनोखं गाव आहे. कोंडाजीबाबा डेरे ट्रस्टच्या या गावातील संस्थेमुळे गावाने आपल्या नावात केलेला 'वैष्णवधाम' हा बदलही त्यामुळेच सार्थ ठरतो.



**शिवाजी डेरे**

''गुरुवर्य कोंडाजी महाराजांचा वारसा वैष्णवधाम चालवत आहे. महाराजांनी पंचक्रोशीत भागवत धर्मातील आचरणाचा प्रसार केला. स्वतः तुकाराम महाराजांप्रमाणे निःसंग जगले. त्यांच्या जीवनाची छाया या गावावर आहे. त्यामुळेच हे गाव शंभर टक्के दारूमुक्त आहे. गावात तंटेबखेडे नाहीत. सर्वजण गुण्यागोविंदाने जगताहेत.''

# वैष्णवधाम ग्रामविकास प्रतिष्ठान, मुंबई : एक अनुकरणीय उत्तरदायित्व!

गुरुवर्य कोंडाजीबाबा डेरे ट्रस्टप्रमाणेच 'वैष्णवधाम ग्रामविकास प्रतिष्ठान' हेदेखील या गावाच्या अध्यात्मिक परंपरेसोबतच शैक्षणिक विकासाला हातभार लावणारं एक मंडळ. बुचकेवाडीमधून घरटी एक किंवा त्यापेक्षाही जास्त माणसं मुंबईत नोकरी- व्यवसायासाठी जातात. पूर्वी ही चाकरमानी मंडळी डबेवाले किंवा आडत व्यवसायात असत. आता बांधकाम, वाहतूक तसंच विविध शासकीय नोकऱ्यांमध्येही ही मंडळी आहेत; पण या मंडळींनी आपली गावाशी असलेली नाळ तोडलेली नाही.

वैष्णवधामची वेगळी ग्रामपंचायत होण्यापूर्वीपासून पारुंडेमधून आंबेगावजवळील औंदुबरेश्वरला 'बाणाची काठी' नेण्याची एक परंपरा या गावात आहे. या बाणाच्या काठीचा परतीचा मुक्काम वैष्णवधाममध्ये असतो. या दिवशी गावात मोठा उत्सव असतो. अनेक भाविक जमतात. सर्वांना प्रसादाच्या स्वरूपात अन्न दिलं जातं. या भोजनाचा खर्च मुंबईतील चाकरमाने करत असत. या मंडळाचं पूर्वीचं नाव होतं मुंबई रहिवासी मंडळ. या मंडळाची स्थापना कै. बबन डेरे यांनी केली. त्यांचा वारसा पुढे नेत तरुण मंडळींनी २००८ सालापासून या मंडळाचं पुनरुज्जीवन केलं.

'वैष्णवधाम ग्रामविकास प्रतिष्ठान' या नावाने एक रजिस्टर्ड संस्थाच उदयाला आली. संस्थेचे अध्यक्ष म्हणून प्रकाश पवार, उपाध्यक्ष तानाजी डेरे, कार्याध्यक्ष अरुण डेरे तर सचिव म्हणून तानाजी बुचके यांची निवड झाली. ही सर्व मंडळी मुंबईत वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या व्यवसायांत आहेत. पण यांनी दर महिन्याला गावासाठी विकासनिधी म्हणून प्रत्येकी शंभर रुपये द्यायचं ठरवलं. या निधीमधून अल्पावधीत साधारणतः साडेपाच लाख रुपये झाले आहेत.

जमलेल्या निधीतून 'गुरुवर्य कोंडाजीबाबा डेरे ट्रस्ट'मध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ई-सॉफ्टवेअर घेण्यात आलंय. तसेच गावातील पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांना वह्यावाटप, गावातील पदवीधर झालेल्या तरुणांचा सत्कार व त्यांना बक्षिस देणं असे उपक्रम वैष्णवधाम ग्रामविकास प्रतिष्ठानमार्फत राबवले जात आहेत.

आज महाराष्ट्रातील ४५ टक्के जनता शहरात एकवटली आहे. गावाकडून शहराकडे जाण्याचं प्रमाणही सतत वाढतच आहे. असे शहरात आलेले लोक नंतर गावाला विसरून जातात. म्हणूनच आपली खेडी ओस पडू लागली आहेत. दिवसेंदिवस खेड्यांची रया जात आहे. या पार्श्वभूमीवर वैष्णवधामच्या चाकरमान्यांनी एक वेगळी दिशा आपल्याला दाखवली आहे. स्वयंपूर्ण ग्रामविकासासाठी त्यांनी उचललेलं हे पाऊल इतर अनेकांसाठी अनुकरणीय आहे.



**''वैष्णवधामचे आम्ही जवळपास शंभर-सव्वाशे लोक दर महिन्याला गावासाठी शंभर रुपये जमवतो. म्हटलं तर ही एक मामुली रक्कम आहे पण ती गावातील गरीब घटकांसाठी मोठी मदतकारक ठरेल असा आमचा विश्वास आहे. दर महिन्याला जमणारा हा निधी आम्हाला गावासाठी आमच्या जबाबदारीचं भान जागतं ठेवायला मदत करतो. या निधीतून आम्ही गावातील गरीब मुलांच्या शिक्षणाचा खर्चही उचलणार आहोत.''**

**-प्रकाश पवार,**

**अध्यक्ष, वैष्णवधाम ग्रामविकास प्रतिष्ठान**

# बुचकेवाडी व लुपिन फाउंडेशन शैक्षणिक समिती : शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी!

**भा**रताच्या लोकसंख्येत तरुणांचं प्रमाण प्रचंड असल्याचं म्हटलं जातं. म्हणूनच सध्या भारताला तरुणांचा देश अशी ओळख प्राप्त होत आहे. पण ही ओळख प्राप्त होताना एक हळहळदेखील तज्ज्ञ व्यक्त करतात. ती म्हणजे या देशात शिकलेले, प्रशिक्षित तरुण खूपच कमी आहेत. सरकारच्या आकडेवारीनुसार भारतात जन्मलेल्या प्रत्येकी सात बाळांपैकी फक्त एकच बाळ पुढे उच्चशिक्षणापर्यंत पोहोचू शकतं. ग्रामीण तरुणांची परिस्थिती तर अधिकच बिकट आहे. ग्रामीण तरुण गरिबी, शहरी तरुणांच्या तुलनेमुळे वावरण्यात येणारा न्यूनगंड यामुळे उच्चशिक्षणातून बाहेर फेकले जातात. असे अर्धवट शिकलेले तरुण ना धड शेतीत राबतात ना त्यांना शिक्षणाच्या जोरावर नोकरीची संधी मिळते.

या पार्श्वभूमीवर वैष्णवधाम या छोट्याशा खेड्यात ग्रामस्थ व लुपिन फाउंडेशन यांनी एक वेगळं पाऊल टाकलं आहे. या गावातील विशेषतः गरीब तरुणांच्या शैक्षणिक खर्चासाठी गावाने एक निधी उभारला आहे. या निधीत सातत्याने वाढ घडवणं, त्यासाठी देणग्या मिळवणं, गरजू विद्यार्थ्यांच्या अर्जांना मान्यता देणं यासाठी गावाने एक समिती स्थापन केली आहे. या समितीचं नाव – बुचकेवाडी व लुपिन फाउंडेशन शैक्षणिक समिती. असा प्रयोग राबवणारं बहुधा हे पहिलंच गाव असावं. विशेष म्हणजे बीजनिधी म्हणून या गावाने सहा लाखांची रक्कम राष्ट्रीयीकृत बँकेत जमाही केली आहे.

या शैक्षणिक निधीतून मदतीसाठी गावातील अनुसूचित जाती–जमातींमधील तरुण तसेच भूमिहीन कुटुंबांतील विद्यार्थ्यांना प्राधान्य देण्याचा निर्णय गावाने घेतला आहे. पदवी, पदव्युत्तर शिक्षण तसंच तंत्रशिक्षण, वैद्यकीय, अभियांत्रिकी किंवा स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना या निधीतून मदत मिळत आहे. ही मदत देताना गावाने या तरुणांना केवळ एकच अट घातली आहे. ती म्हणजे या मदतीची त्या विद्यार्थांनी परतफेड करायला हवी. ज्यायोगे इतर गरीब विद्यार्थ्यांना या निधीतून मदत होऊ शकेल.

तुकाराम महाराजांनी म्हटलंय– 'शुद्ध बीजापोटी, फळे रसाळ गोमटी' वैष्णवधाम या गावाने शैक्षणिक समितीच्या रूपात असं एक शुद्ध बीज पेरलं आहे. भविष्यात त्याची रसाळ फळं साऱ्या समाजाला मिळावीत अशी या गावाची अपेक्षा आहे.

## शैक्षणिक समिती : कारभाराचे स्वरूप व रचना

- समितीमध्ये गावातील सात व्यक्तींची नेमणूक. यामध्ये तीन ग्रामस्थ, सरपंच, मुंबईमध्ये कामानिमित्त राहणाऱ्यांचे दोन प्रतिनिधी व लुपिन फाउंडेशनचा एक प्रतिनिधी, अशी समितीची रचना.
- समितीवरील सदस्यांची निवड ग्रामसभेत होते. वर्षअखेरीस समितीच्या आर्थिक हिशोबांचा ताळेबंद ग्रामसभेला सादर होतो.
- समितीचे व्यवहार पारदर्शक राहण्यासाठी राष्ट्रीयीकृत बँकेत खाते व सर्व व्यवहार चेकद्वारे होतात.
- वर्षातून किमान चार समितीच्या बैठका होतातच, या बैठकांचे इतिवृत्त नोंदवले जाते.



**"पूर्वी हा गाव जगापासून तुटलेला होता. एखादी एसटीसुद्धा गावात येत नव्हती. १९९२ ला पहिली एसटी बुचकेवाडीसाठी सुरू झाली. आता सकाळी सातच्या गाडीने २५–३० पोरं–पोरी कॉलेजला जातात. आम्हाला एकच वाटतं, या कॉलेजला जाणाऱ्या तरुणांमधून कुणी सुशिक्षित बेकार राहू नये, आम्ही शेतकरी शेतात जसं कसदार धान्य पिकवतो तशी आमची मुलंही कुशाग्र बुद्धीने समाजात वावरावीत यासाठीच तर आम्ही शैक्षणिक समितीची स्थापना केली."**

# मच्छीमार सहकारी सोसायटी : बुचकेवाडीच्या तरुणांची उद्योजकतेकडे झेप

बुचकेवाडीमध्ये आदिवासी समुदायातील ठाकर व महादेव कोळी कुटुंबं लक्षणीय आहेत. या कुटुंबांमधील तरुणांना आजूबाजूच्या परिसरातील पाझरतलाव, बंधारा यावर मच्छीमारी करणे, खेकडे पकडणे यांचा छंद आहे. जवळपास २०-२५ तरुण हे काम छंद म्हणून करण्यात गुंतलेले असत. वर्षातील बाराही महिने हे तरुण कुठे ना कुठे आपल्या छंदात मग्न असत. लुपिन फाउंडेशनने या तरुणांना आपल्या छंदाचे रूपांतर व्यवसायात करण्याची प्रेरणा दिली. मग सोळा तरुणांनी एकत्र येऊन 'मच्छीमारी सहकारी सोसायटी' स्थापन करण्याचा विचार केला. या तरुणांच्या उत्साहाला लुपिन फाउंडेशनने साथ द्यायचं ठरवलं. या तरुणांना रत्नागिरीतील 'डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठा'च्या मत्स्य विद्यालयातून तसंच श्रमजीवी संस्था यांच्यामार्फत पाच दिवसांचं प्रशिक्षण देण्यात आलं.

२०१४मध्ये या युवकांनी आपसात वर्गणी करून पैसे जमवले. त्यातून त्यांनी २५ हजार रुपये खर्चून मत्स्य बी आणलं. हे बी बंधाऱ्याच्या पाण्यात सोडलं गेलं आहे. लवकरच त्याचं उत्पन्नही हाती येईल. आदिवासी समूहांना भारतीय राज्यघटनेने वन व परिसरातील संपत्तीच्या रक्षणाबरोबरच उदरनिर्वाहाचाही हक्क दिला आहे. तलावात मत्स्य उत्पादनाच्या माध्यमातुन बुचकेवाडीतील आदिवासी तरुणांनी राज्यघटनेने दिलेला अधिकार तर मिळवलाच आहे, शिवाय त्यांनी उद्योजकतेकडेही झेप घेतली आहे. ■



# बुचकेवाडीचं वैष्णवधाममध्ये अशा रीतीने रूपांतरण झालं...

## या अवस्थांतराची फळं ज्यांनी चाखली त्यातील काहींचे प्रातिनिधिक अनुभव थोडक्यात...



### ७० टक्के क्षेत्र बागायती झालं

"पूर्वी आमच्या सगळ्यांना कोरडवाहू जमिनीतच राबावं लागायचं. खरीप नि रब्बीचा हंगाम सरला की आम्ही मुंबईला हेलपाटी धंद्याला जायचो. चैत्र संपला की गावात गडीमाणूस दिसत नव्हता. आता ७० टक्के जमीन बागायत झाली. आता भरतं पुरतं दिसू लागलंय."

**–शांताराम बुचके**



### हमालीचे दिवस गेले

"ह्या गावात पूर्वी बहुतेक सगळे अडाणीच होते. हमालीशिवाय दुसरा उद्योग आम्हाला येत नव्हता. आता पोरं शिकायला लागलीत. हमाली कुणीही करत नाही."

**–लक्ष्मण पवार**



### वहितीखालील क्षेत्र वाढलं

"पूर्वी आमच्या आदिवासी वाडीवरून रात्रीचं बाहेर पडायला भीती वाटायची, कारण भयाण रान पसरलेलं दिसायचं. आता वहितीखालील क्षेत्र वाढलं. रस्ते तयार झाले. गाव सुंदर दिसू लागलंय."

**– साईनाथ पवार**



## नव्या सुनांसाठी दिवस नवे

''पूर्वी पाण्याचे लय हाल होत होते. एप्रिल-मे महिन्यात पार दुसऱ्या गावात हंडे घेऊन वणवण करायला लागायची. गावातल्या सुनांना आता ते सोसण्याचे दिवस राहिले नाहीत.''

**–सुलाबाई पवार**



## आता रोजगार गावातच

''आमच्या आदिवासी बायांना मजुरीसाठी बाहेरगावच्या शेतात जावं लागायचं. आता गावातच रोजगार मिळतोय.''

**–राहीबाई गवारी**



## दूधदुभतं वाढलं

''पूर्वी फक्त बांधा-बांधाला जंगली गवत असंल तेवढाच चारा मिळायचा. आता शेतकरीच मका, ज्वारी यासारखी चारपिकं घ्यायला लागले. त्यामुळे दूध उत्पादन वाढलंय.''

**–नामदेव बुचके**



## भाकड जनावरं राहिली नाहीत

''पूर्वी भाकड जनावरं रानात मोकाट हिंडून रानातला चारा फस्त करायची. ह्या जनावरांची संख्या आता घटली. त्यामुळे चारा साठवून उन्हाळ्यातही उपयोगाला येतो.''

**–हरिभाऊ गवारी**



## गाव गेलं मोठ्या पदावर

''आमच्या आदिवासी वाडीवरच्या प्रत्येक घरातला एक तरी माणूस आज कुठल्या ना कुठल्या सरकारी खात्यात मोठा पदावर काम करतोय. हे गावाच्या विकासाचंच लक्षण आहे.''

**–सावळेराम गवारी, माजी सरपंच**



## संगनमताने आधुनिक शेती

“पूर्वी आम्ही सगळे वायली वायली शेतं करायचो. कुणी कुणाला इचारपूस करत नव्हतं. आता एकमेकांच्या इचारानं पिकं घेतोय. आधुनिक शेती करतोय.”

**–दत्तू पवार**

## नगदी पिकांचं प्रमाण वाढलं



“पूर्वी आम्ही भात, भुईमूग, गहू, बाजरी एवढीच पारंपरिक पिकं घ्यायचो. आता नगदी पिकाचं प्रमाण वाढलं. त्यामुळे आमचे दिवस पालटलेत.”

**–विठ्ठल बुचके**



## आता शेतीच नाही तर बाकी उद्योगही वाढले

“पूर्वी गावातले चारदोनच लोक दुधाचा धंदा करायचे. त्यांना दूध घालायला जुन्नरला जावं लागायचं. आता गावातच डेअरी झालीय. गावातले पन्नासेक लोक दुधाच्या धंद्यात आहेत.”

**–रामदास डेरे**

## पाणी आलं, फळ बागायत वाढली



“पूर्वी आमच्या गावातले शेतकरी वर्षातले दोन महिने मुंबईला आंब्याच्या आडतीवर राबायचे, पण आंबा शेतकरी कुणीच नव्हते. आता ती हमाली गेली. आता बुचकेवाडीचा शेतकरी बाजारात आंबा पाठवू लागलाय.”

**–मारुती पवार**



## पाण्याचं महत्त्व कळलं

“पाणलोट क्षेत्रविकासाच्या कामात सहभागी झाल्यामुळे आम्हाला पाण्याचं महत्त्व कळलं. म्हणूनच आता या गावातल्या शेतकऱ्यांनी ड्रिप इरिगेशनकडे मोहरा वळवलाय. हे निसर्गाला अनुकूल विकासाकडे जाणारं पाऊल आहे.”

**–हैबती पवार**



## नवं तंत्रज्ञान, नव वाण, नवं आत्मभान

‘‘पूर्वी आम्ही पारंपरिक वाण पेरायचो. नव्या नव्या गोष्टींची आम्हाला माहितीच नव्हती. आता नव्या वाणांच्या लागवडीमुळे उत्पन्न वाढलंय. नवं नवं शिकावं असं वाटायला लागलंय.’’

**–तुकाराम पवार**



## फुलली परसबाग ही सुंदर!

‘‘आमच्या परसबागेतून मिरच्या, आळू, भेंडी, बीट, पेरू, पालक, कोंथिबीर, मेथी एवढे जिन्नस मिळताहेत, आणि हे सर्व फक्त घरातल्या सांडपाण्यावर!’’

**–राजश्री बुचके**



## रोजगाराची नवी दिशा मिळाली

‘‘आमच्या ठाकर समाजाची गुजराण जंगलावरच असते. आम्हाला जमीन जवळपास नाहीच. गावाने रानात चराईबंदी केली नि आम्हाला चारा विकायचा नवीन रोजगार मिळाला. रानभाज्याही भरपूर मिळायला लागल्या.’’

**–वनिता केदार**



## शाळा झाली हाय–फाय

‘‘इतर शाळांप्रमाणेच आमच्या शाळेतली पोरं पाटी–पेन्सिलीने शिकायची. पण लुपिन फाउंडेशनने ई–लर्निंग प्रकल्प आमच्या शाळेत सुरू केला. आता आमचे विद्यार्थी ऑडिओ–व्हिज्युअल माध्यमातून शिकताहेत.’’

**–हेमंत दिवटे,** मुख्याध्यापक, जि.प. शाळा, बुचकेवाडी



## शेतकऱ्यांची पत वाढली

‘‘बँका शेतकऱ्यांना दारात उभं करत नाहीत; पण बुचकेवाडीतल्या शेतकऱ्यांची उपक्रमशीलता कॅनरा व स्टेट बँकेच्या अधिकाऱ्यांना भावली. त्यांनी गावात येऊन शेतकऱ्यांच्या कर्जप्रकरणांची प्रक्रिया पूर्ण केली. शेतकऱ्यांनीही आपला लौकिक राखत कर्जं फेडली.’’

**–सुरेश बुचके**



## गाव झालं चकाचक

''गावात सगळे मिळून अधूनमधून ग्रामस्वच्छता करतात. त्यामुळे रोगराई कमी झाली. सगळ्या गावाला आता स्वच्छतेचं वळण लागलंय.''

**–वर्षा डेरे, सरपंच**

## सर्वसामान्यालाही ओळख मिळाली



''मी पूर्वी माझ्या किंवा दुसऱ्याच्या शेतात मजुरीने काम करायचो. या गावात माझी काहीच ओळख नव्हती. लुपिन फाउंडेशनने माझी आदिवासी पाणलोट सेवक म्हणून निवड केली. प्रशिक्षणाची संधी दिली. मला आत्मविश्वास दिला. आज गावात मला लोक सन्मानाने वागवतात. एवढंच नाही, तर ग्रामपंचायत सदस्य म्हणून माझी बिनविरोध निवड झालीय.''

**–काशिनाथ गवारी**



# बुचकेवाडी ते वैष्णवधाम या प्रवासातील साक्षीदारांच्या प्रतिक्रिया



**भरत वाणी**
तालुका कृषी अधिकारी

## छोटी वाडी, मोठे शेतकरी

केवळ तीनशे–सव्वातीनशे कुटुंबं असलेल्या वैष्णवधाम या गावातील शेतकऱ्यांचं कौतुक करावं तेवढं कमीच आहे. महाराष्ट्रात एकीकडे शेतकरी आत्महत्या करताहेत, ही मनाला उदास करणारीच घटना आहे; पण दुसरीकडे वैष्णवधामसारख्या छोट्याशा गावाकडे पाहिलं की मन आशेने पल्लवित होतं. या गावातील शेतकरी यशोगाथेचा नवा अध्याय लिहिताहेत असं मला वाटतं. एके काळी कोरडवाहू शेती करणारं हे गाव आज ठिबक सिंचनाकडे वळलं आहे. त्यांच्या या प्रयोगाला बँकांनी दिलेलं प्रोत्साहनही मला खूप मोलाचं वाटतं.

गटशेतीचा प्रयोग करून शेती किफायतशीर करण्याचा या गावाचा प्रयोगही कौतुकास्पद आहे. जलसंवर्धन, जल व्यवस्थापन आणि योग्य कृषी नियोजन ही त्रिसूत्री या गावाने मोठ्या उत्साहाने अवलंबलेली दिसते. कोकण आंबा या उत्पादनासाठी ओळखला जातो. त्याप्रमाणे जुन्नर, आंबेगाव हे तालुके टोमॅटो व कांदा उत्पादनासाठी ओळखले जातात. वैष्णवधाममधील शेतकऱ्यांनी स्थानिक प्रशासनाच्या पाणंद रस्ता योजनेचा खूप कल्पक सदुपयोग करून घेतला आहे. या भागातील अनेक शेतकऱ्यांच्या जमिनीपर्यंत वाहन जाऊ शकत नाही. केवळ या अडचणीमुळे भाजीपाला उत्पादनात वाढ होऊ शकत नाही. या समस्येवर मात करण्यासाठी या गावाने पाणंद रस्ते योजनेद्वारे रस्ते बांधून घेतले आहेत. इतर गावांनी हा मार्ग अनुसरल्यास तालुक्याचं उत्पादन वाढू शकतं.

आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे येथील शेतकरी फळ उत्पादनामध्ये रस दाखवत आहेत. कोकणची मक्तेदारी असलेला केशर आंबा येथील शेतकऱ्यांनी लावला आहे. अशा अनेकविध कृषिप्रयोगांमध्ये आघाडी घेणाऱ्या या छोट्याशा गावातील कल्पक शेतकरी मला वृत्तीने मोठे वाटतात. अशा या गावाच्या आगामी विकासाला माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा!



**श्री. संजय कडू**
वन परिक्षेत्र अधिकारी,
जुन्नर

# वैष्णवधाम : एक वनमित्र गाव

वैष्णवधाम हे भीमाशंकरच्या कुशीतलं गाव. भीमाशंकर हे एक अभयारण्य आहे. या गावाच्या परिसरातील वनाचं रक्षण या गावाने खूप जिव्हाळ्याने केलं आहे. वनजमिनीवर माथा ते पायथा विविध पाणलोट क्षेत्रविकासाची कामं केल्यामुळे जमिनीची धूप थांबली. या गावाने वृक्षदिंडी, वनसंरक्षणाच्या प्रबोधानासाठी कीर्तन, असे किती तरी उपक्रम सातत्याने आखले आहेत. याशिवाय चराईबंदी, जळणबंदीसाठी पर्यायी ऊर्जेचा वापर, अशी कौतुकास्पद पावलंही उचलली आहेत.

वनसंपदेचा शाश्वत पद्धतीने संधारण आणि विकास, वनोत्पादनात वाढ, पर्यावणरणाचं संरक्षण आणि दारिद्र्यनिर्मूलन या बाबी राज्याच्या वनधोरणाचा भाग आहेत. या सर्वच आघाड्यांवर वैष्णवधाम स्वप्रेरणेने सक्रिय झालं आहे. महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार वैष्णवधाम हे गाव वनग्राम म्हणून घोषित करण्यात आले आहे. वैष्णवधाम गावातील वनाचे संपूर्ण संरक्षण करून त्यांचं संगोपन, देखभाल व व्यवस्थापनाची जबाबदारी गावातील वनव्यवस्थापन समितीने स्वीकारली आहे.

२०१३-१४ साली संत तुकाराम वनग्राम अभियानात पुणे जिल्ह्यात या गावाने प्रथम क्रमांक मिळवला आहे. याशिवाय याच अभियानात २०१३-१४ सालासाठी वैष्णवधामने राज्यस्तरावरही प्रोत्साहनात्मक रु. २५,०००/- रोख बक्षिस मिळवलेले आहे. वनसंवर्धनासाठी या गावाने एक वस्तुपाठच इतर गावांसाठी ठेवला आहे. या वनमित्र वैष्णवधामाच्या सर्वांगीण विकासासाठी माझ्या शुभेच्छा!!



**आशाताई बुचके**
सदस्य,
पुणे जिल्हा परिषद

# आकांक्षापुढति जिथे गगण ठेंगणे!

श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनी महाराष्ट्रगीतामध्ये म्हटलं आहे– 'गगनभेदि गिरिविण अणु नच जिथे उणे, आकांक्षापुढति जिथे गगन ठेंगणे...' म्हणजे महाराष्ट्रातील डोंगरदऱ्या जशा गगनाला भिडू पाहतात, तद्वतच इथल्या माणसांच्या आकांक्षाही उंच आहेत. वैष्णवधाम या गावासाठी तर हे वर्णन गेल्या दहा वर्षांच्या काळात अगदी चपखल जुळलं आहे.

पूर्वी या गावातले लोक मुंबईला डबेवाला म्हणून कष्टाचं काम करत किंवा आडतीवर राबत. आज अशी परिस्थिती आहे, की या गावातील आदिवासी कुटुंबांतील माणसं मोठमोठ्या हुद्द्यांवर कार्यरत आहेत. केवळ शहरात जाऊन मोठ्या हुद्द्यावर गेलं म्हणजे विकास झाला, असंही या गावाने मानलेलं नाही, तर आपली शेती आधुनिक पद्धतीने कसायला या गावाने सुरुवात केली. पाण्याचं महत्त्व ओळखलं. पाणलोट क्षेत्रविकासासाठी श्रमदान केलं. अनेक विकासकामांत आघाडी घेतली.

मला सर्वांत कौतुकास्पद वाटते ती या गावातील महिलांची धडपड. जुन्नर–आंबेगाव तालुक्यांतून शेतमाल पॅकिंगसाठी लागणाऱ्या पिशव्या बनवण्याचा कारखाना या महिलांनी सुरू केला आहे. स्थानिक गरज ओळखणे, त्यानुसार उद्योग सुरू करणे, इतकंच नव्हे, तर गावाच्या सर्वांगीण विकासात मध्यवर्ती भूमिका निभावणे, हे गुण या गावच्या महिलांमध्ये पाहून मला खूप आनंद होतो. गावातल्या पुरुषांच्या बरोबरीने या महिला विकासप्रक्रियेत पुढे येत आहेत हे पाहून मला समाधानही वाटत आहे. पुणे जिल्हा व राज्यस्तरावर या गावाने अनेक पुरस्कार मिळवले. देशपातळीवरही इथल्या विकासकामांची विजयपताका दुमदुमत राहो, हीच सदिच्छा! ■



**श्री. सचिन शिवाजी घाडगे**
गटविकास अधिकारी (उ.श्रे.)
पं.स.जुन्नर

# पर्यावरण विकासरत्न बुचकेवाडी...

केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांची परिणामकारक अंमलबजावणी लोकसहभाग व स्वयंसेवी संस्थांच्या समन्वयातून ग्रामपंचायत बुचकेवाडीचा निश्चितच कायापालट झालेला आहे. या सर्व घटकांचा गुणगौरव म्हणून ग्रामपंचायत बुचकेवाडीवर विकासपुस्तिका प्रकाशित होत आहे हे समजून आनंद वाटला.

शासनाने सुरू कलेल्या पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम योजनेत सहभागी होऊन पर्यावरण विकासरत्न पुरस्कार प्राप्त करून खऱ्या अर्थाने पर्यावरण संवर्धन व जागृती गावाने केली आहे. शाश्वत व सर्वसमावेशक विकासाच्या दृष्टीने गावाची पावलं पडू लागली. ई-पंचायत, संग्रात यासारख्या प्रकल्पांची यशस्वी अंमलबजावणी करून ग्रामपंचायतीने संगणक सुविधांच्या माध्यमातून ग्रामपंचायतीचा कारभार पारदर्शक व गतिमान केला आहे. यामुळे ग्रामस्थांचा वेळ, पैसा, श्रम यांची बचत होत आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी करून गावातील कुटुंबांना स्थानिक पातळीवर रोजगार निर्माण करून तर दिलाच, तसेच गावात पायाभूत सुविधा व विकास संसाधनांची निर्मितीही केली आहे. नरेगाच्या माध्यमातून गांडूळखत प्रकल्प, कंपोष्ट खतनिर्मिती करून सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देत फळबाग लागवड व वृक्षसंगोपनाच्या कामातून पर्यावरण संतुलन व स्थानिकांना रोजगार उपलब्ध करून दिला आहे. १००% ग्रामपंचायत करांची वसुली, बायोगॅस उभारणी, घरोघरी शौचालयाचा वापर, शुद्ध पाणीपुरवठा, स्वच्छ शाळा, सुंदर अंगणवाडी केंद्राची उभारणी करून गावाने आदर्श गावाकडे वाटचाल सुरू केली आहे. पाणी अंदाजपत्रक, आधुनिक पद्धतीने वनांचं संरक्षण व व्यवस्थापन करून ग्रामविकासात ग्रा.पं. बुचकेवाडी मैलाचा दगड ठरली आहे. ही बाब निश्चितच कौतुकास्पद आहे.

सर्व विकास अभियानांची चांगल्या प्रकारे अंमलबजावणी करून ग्रामीण लोकशाही व्यवस्थापनात अग्रेसर ग्रामपंचायत म्हणूल बुचकेवाडी आदर्श ठरली आहे. यासाठी उत्तम काम करणारे गावचे पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी या सर्वांचं हार्दिक अभिनंदन! या सर्वांमध्ये उत्तम काम करण्याची आवड व स्पर्धा निर्माण होऊन ग्रामविकासाची वाटचाल यशस्वी व्हावी म्हणून माझ्या हार्दिक शुभेच्छा!

# बुचकेवाडी ते वैष्णवधाम
# या प्रवासात मिळालेली शाबासकी...



# वैष्णवधामची दखल वर्तमानपत्रात



सकाळ पुणे जिल्हा

मंगळवार, ५ मार्च २०१४ 3

## शिवराई शेतकरी मंडळाचे बुचकेवाडी येथे उद्घाटन

### पुण्यातील सोसायट्यांना करणार थेट भाजीपाला विक्री

शेलूर, ता. ४ : राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक (नाबार्ड) पुरस्कृत व पुण्यातील ल्युपिन फाउंडेशनच्या मार्गदर्शनाखाली बुचकेवाडी (ता. जुन्नर) येथे स्थापन केलेल्या शिवराई शेतकरी मंडळाचे उद्घाटन सरपंच सुरेश गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले. या मंडळाच्या वतीने पुण्यातील सोसायट्यांना थेट भाजीपाला विक्री करण्यात येणार आहे.

या वेळी ल्युपिन फाउंडेशनचे सहाय्यक प्रकल्प समन्वयक एन. एस. पठाण, शिवाजी हैद्रे, श्री. माळी, काशिनाथ गवारी, दशरथ पवार, बाळू बोऱ्हाडे उपस्थित होते.

या वेळी ल्युपिनच्या संचालक पल्लवी पारशी म्हणाल्या, की सध्या १६ शेतकरी सदस्यांना ४५ [illegible] एकत्रित पिकणारा भाजीपाला पुणे येथील तीन सोसायट्यांना थेट विक्री करण्याचा उपक्रम सुरू केला आहे. [illegible] त्यांचे उत्पन्न वाढेल. या मंडळाला नाबार्डतर्फे अभ्यास सहली, प्रशिक्षणाकरिता तीन वर्षांसाठी [illegible] हजार रुपयांचे अनुदान मिळणार आहे.

ल्युपिनचे प्रकल्प समन्वयक व्यंकटेश हैद्रे म्हणाले, की फाउंडेशनच्या वतीने गेली तीन वर्षे या गावात इंडो-जर्मन पायलट [illegible] विकास कार्यक्रम राबविला जात आहे. मंडळाचे अध्यक्ष गणेश पवार यांनी प्रास्ताविक केले. एन. एस. पठाण यांनी सूत्रसंचालन केले. [illegible] यांनी आभार मानले.

बुचकेवाडी (ता. जुन्नर) : शिवराई शेतकरी मंडळाच्या उद्घाटन प्रसंगी ग्रामस्थ व ल्युपिन फाउंडेशनचे कार्यकर्ते.



सकाळ पुणे जिल्हा TODAY

## सरपंचांनो, कामे करा, पुरेसा निधी देऊ

### जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्षांचे आवाहन; विविध पुरस्कारांचे वितरण

# लुपिन ह्युमन वेल्फेअर अँड रिसर्च फाउंडेशन


‘लुपिन लिमिटेड’ हा एक आंतरराष्ट्रीय ख्यातीप्राप्त औषध निर्मिती करणारी कंपनी आहे. ‘लुपिन ह्युमन वेल्फेअर अँड रिसर्च फाउंडेशन’ ही लुपिन लिमिटेडचीच पण स्वतंत्र संस्था. या संस्थेद्वारे लुपिन लिमिटेड भारतभर सामाजिक उत्तरदायित्वाच्या भावनेतून गेली २५ वर्षं सामाजिक विकासाचे कार्यक्रम राबवत आहे.

लुपिन फाउंडेशनची स्थापना महात्मा गांधींना आदरांजली वाहत २, ऑक्टोंबर १९८८ रोजी झाली. पर्यायी व शाश्वत विकासाची प्रतिमानं लोकसहभागातून निर्माण करणं, या प्रतिमानांचे प्रयोग इतरही भागात घडवणं हे फाऊंडेशनच्या कामाचं स्वरूप. लुपिन सध्या देशभरातील ३,४७८ गावं, ४६ तालुके, १७ जिल्हे व पाच राज्यांमध्ये (राजस्थान, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, गुजरात आणि उत्तराखंड) विकास उपक्रम राबवित आहे.

## शहराकडे न जाता लोक। धावावे उलट खेड्याकडे।
## ऐसी करावी ग्रामसेवा। हेचि कर्म आवडे देवा।
## संशय काही मनी न धरावा। तुकड्या म्हणे।

ग्रामगीतेचा समारोप करताना राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी वरील ओळी लिहिल्या. या ओळींची साक्षात प्रचिती आपल्याला वैष्णवधाम या खेड्यात येऊ शकते. महाराष्ट्रात काही 'आदर्श' गावं आहेत. या आदर्श गावांना त्या त्या गावातील कोणा एका करिष्मा असलेल्या व्यक्तीचं वलय आहे. वैष्णवधाम हेदेखील आदर्श गावच. या गावानेही अनेक पुरस्कार मिळवलेत. पण या गावाचं वैशिष्ट्य म्हणजे कुणी एकाने हा करिष्मा करून गावाला बदललेलं नाही, तर साऱ्या गावाने, तरुण, वृद्ध, स्त्री, पुरूष, विद्यार्थी अगदी सर्वांनी ग्रामसेवेचं व्रत घेतलं नि सर्वांची उन्नती साध्य केली. म्हणून खऱ्याखुऱ्या शाश्वत विकासाचा शोध घ्यायचा असल्यास वैष्णवधामला तुम्ही अवश्य या. तसं जमणार नसेल तर या पुस्तिकेच्या झरोक्यातून पहा...बुचकेवाडी या छोट्या खेड्याने वैष्णवधाममध्ये केलेलं आपलं रूपांतरण!



**लुपिन ह्युमन वेल्फेअर अँड रिसर्च फाउंडेशन,**

**मुख्य कार्यालय :** १६०, कृष्णा नगर, भारतपुर, राजस्थान, पिनकोड - ३०२ ००१. फो. (९१५६४४ - २२३०२३, २३२४३७)
ई-मेल - ed@lupinfoundation.in

**पुणे कार्यालयाचा पत्ता** : सर्वे नं.- ४६-अे, मौजे नांदे, तालुका - मुळशी, जिल्हा - पुणे, पिनकोड - ४११ ०४२.
फोन क्र. ०२०-२०२७०२९७ ई-मेल - pune@lupinfoundation.in वेबसाइट : www.lupinfoundation.in